असें सोंग नखरे स्त्रिया करितात कां? एकदां त्यांच्यावर ही आकाशाची कुऱ्हाड कोसळली कीं त्या तें वैधव्याचें गाठोडें पदरांत बांधून आपल्या भर्त्याचे गुण अवगुण वाणीत व सर्व घरच्या दारच्यांचा जाच काढीत मरून जातात. नवरा जरा अजारी झाला कीं तिचें तोंडचें पाणी पळतें. व ती त्याला हरघडी प्राणापेक्षांही जास्त जपते. मग ती भक्तिभावानें म्हणा अगर भीतिभावानें म्हणा. जसा तो असेल त्याप्रमाणें तीही त्याजबरोबर वागत असेल. कारण आपण कोणाही बरोबर ममतेनें; किंवा दानें वागत

असलों म्हणजे तो म्हणा अगर ती म्हणा. कशीही बाजिंदी असली तरी तिला त्याबरोबर चांगले वागणें भागच पडतें. नाहीं तर तुम्ही तिला रोज पाहिजे तशी वाटेल त्याप्रमाणें वागवून पुन: तिनें नेकीनेंच रहावें असें म्हणाल तर कसें होईल? मग बरी किंवा वाईट वागणूक सहजीं स्वाभाविकच उत्पन्न होते. तुमच्यावरून तुम्ही पहा. तुम्हांला एक लुच्चा भेटला म्हणजे तुम्ही त्यापेक्षां दसपट लुच्चे बनतां किंवा नाहीं? तसेंच हें. इंग्रजीत एक म्हण आहे कीं, ममतेपासून ममता उत्पन्न होते. तर जशी ममतेच्या पोटीं ममता उपजते तसेंच सर्व गोष्टींत आधीं आपले मनास विचारून मग दुसऱ्याचा विचार करावा. पण पुरुषाचेजवळ तेंही नाहीं. एखाद्याची बायको वर्ष दोन वर्षे आजारी पडली तर हे राजश्री ''ही कधी मरेलहो, औषध देऊन कंटाळलों'' असें म्हणायाचें. पण बायको कशीही असो, ती जनलज्जेकरितां तरी असें म्हणणार नाहीं. पण इथें काय? मुसलमानासारिखे सदापूज्यच; श्रीमंत असले ह्मणजे अमीर, भिकारी हुये तो फकीर. बरें आतां मेल्यावर तर म्हणे पीर. तसें हें लग्न झालें नाहीं तर ब्रह्मचारी; लग्न केलें तर घरबारी गृहस्थ; बरे आतां शेवटीं सर्व विधि झाले म्हणजे मग संन्याशी; कां झालें. पण संन्यास घ्यायाचा कधीं? तर संध्याकाळीं. प्राणोत्क्रम होईल असें वैद्यांनी निदान ठरविलें म्हणजे सकाळीं तेही दोन प्रहरीं संन्यासदीक्षा घ्यावयाची तोंपर्यंत तुमची या संसाराची आशा सुटत नाहीं.

■ ■ ■

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

B. A-III (Sem 5)

प्रतीक बनले आणि त्यातून त्याची उपासना आपल्या धर्मविधीत रूढ झाली. मानवी जीवनाला सर्वांगांनी वेढून टाकणारी ही वृक्षपूजा या स्वरूपात जन्मास आलेली आहे.

आनंद व्यक्त करण्यासाठी, देवदेवतांना प्रसन्न करून घेण्यासाठी आणि समृद्धी देणाऱ्या घटकांविषयी आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आपण अनेक सणसोहळे आणि उत्सव साजरे करीत असतो. या आनंदोत्सवाला आपण कालांतराने धार्मिक अधिष्ठानही बहाल करून टाकलेले असते. अशा या उत्सव नि सणांमध्येही आपण वृक्षांची पूजा या ना त्या कारणांनी करीत असतो. या वृक्षपूजेची सांगड कधीकधी आपण आपल्या इतिहासातील व्यक्ती आणि घटनांशी घातलेली असते. आपल्याकडे दसरा सण साजरा करताना आपण शमी वृक्षाची पूजा करीत असतो. पांडवांनी अज्ञातवासात असताना या वृक्षावर आपली शस्त्रे ठेवली, म्हणून आपण याची पूजा करतो. ती शस्त्रे घेऊन त्यांनी विजय संपादन केलेला आहे, अशी आपली श्रद्धा आहे. श्रीरामानेही या वृक्षाची आधी पूजा केली व मग तो विजययात्रेला निघाला, म्हणून आपण आजही शमीची पूजा करतो. आपटा किंवा अश्मंतक वृक्ष हा महादोषांचे निवारण करतो व शत्रूचा नाश करतो, अशी आपली परंपरा सांगते म्हणून दसऱ्याला आपण याचीही पूजा करीत असतो. प्रजोत्पादक आणि आयुष्यवर्धक म्हणून गणेशचतुर्थीला आपण दूर्वा पूजतो. गणेशाला वाहतो, तर बंगालमध्ये दुर्गापूजेच्या उत्सवात दुर्गेचे प्रतीक म्हणून वृक्षांच्या फांद्या आणि पानांची पूजा केली जाते. प्रयाग या तीर्थक्षेत्री असलेल्या वडाखाली राम, सीता आणि लक्ष्मण यांनी आसरा घेतला होता, असे मानले जाते. या वृक्षापासून जन्मलेल्या दुसऱ्या वटवृक्षाची पूजा अलाहाबादमधील भाविक मंडळी या निमित्ताने करतात. उत्तर भारतातील काही खेड्यांमध्ये ग्रामदेवतेच्या मंदिरासमोर एक बांबू पुरलेला असतो. मंदिरात राहून देवाला कंटाळा आला, की या बांबूवर देव काही दिवस राहतो असे मानून त्या बांबूची पूजा केली जाते. त्याची यात्राही भरविली जाते. मुंड आणि बैंगा जातीचे आदिवासी लोक चैत्री पौर्णिमेला एक वसंतोत्सव साजरा करतात. त्या वेळी अविवाहित मुलीकडून सालवृक्षाची पूजा करून त्याच्याभोवती सुताने गुंडाळलेली मडकी ठेवतात व त्या वृक्षाभोवती नृत्य करतात. दुसऱ्या दिवशी गावातला पुजारी या सालवृक्षाची डहाळी प्रत्येक घराच्या वरती ठेवतो. त्याबद्दल त्याला दक्षिणा दिली जाते. भिल्ल लोक होळी आणि दिवाळीत वृक्षपूजा करतात व त्या वृक्षांच्या तळी मातीचे हत्ती, बैल, घोडे इ. प्राण्यांची प्रतीके ठेवतात. थोडक्यात काय, तर आपण ही वृक्षपूजा आपल्या सणसोहळ्यात आणि उत्सवात सामावून घेतलेली आहे.

लोकजीवन आणि लोकसंस्कृतीपेक्षाही आदिवासींचे जीवन निसर्ग आणि भूमी यांच्याशी अधिक निगडित झालेले असते. ते जंगलाचे रहिवासी असतात. जंगलावर

Principal
Arts-Commerce College
Yeoda, Dist. Amravati
Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amr...

अवलंबून असतात. जंगलात वृक्षांच्या साक्षीने वाढतात-विस्तारतात. जंगल हा त्यांचा बहिश्चर प्राण असतो. त्यामुळे आदिवासींच्या जीवनामध्ये जंगल म्हणजे वृक्ष-वेली व्यापून उरलेल्या असतात. आदिवासींचे अन्न, घरे, देवदेवता, धर्मविधी, विवाहसोहळे यांमध्ये जंगलातील वृक्षांना किती महत्त्व असते, हे आपणाला समजणार नाही. त्यांचे उत्सवदेखील ऋतुबदलाशी जोडलेले असतात. आदिवासी जाती-जमाती आपले जे विवाह साजरे करतात, त्यामध्ये वृक्षाला एक अनन्यसाधारण स्थान प्राप्त झालेले आढळून येते. ओरिसातील गंजाम जिल्ह्यात भोंडारी नावाची एक आदिवासी जात आहे. या लोकांमध्ये एखाद्या मुलीचा विवाह वयात येण्यापूर्वी झाला नाही, तर तिचा विशिष्ट वृक्षाशी विवाह लावतात. पुढे जन्मभर त्या मुलीने त्या वृक्षाला स्पर्श करावयाचा नसतो, अशी या लोकांची श्रद्धा आहे. ओरिसातीलच बोट्टड नावाच्या आदिवासींमध्ये विवाहवेळी लग्नमंडपात सालवृक्षाचे नऊ सोट (खोड) रोवल्याशिवाय लग्न पूर्ण होत नाही. या खांबाला विशेषतः मधल्या खांबाला हळदीच्या पाण्याचे मडके बांधतात. कदाचित हा मधला खांब म्हणजे या वधूचा प्रतीकात्मक वर मानला असावा. आसाम आणि छोटा नागपूर भागातील आदिवासी लोक बांबूलाच देव मानतात. त्यांच्या विवाहाच्या वेळी वधू-वराला बांबूला प्रदक्षिणा घालाव्या लागतात. नंतर तीन बांबूंची किंवा तीन बांबूंच्या तुकड्यांची पूजा केली जाते. उरांग आदिवासी जमातीमध्ये गुरांच्या अभिवृद्धीसाठी गारू या झाडाची फांदी पूजतात. काही टोळ्या विवाहाच्या वेळीही ती पूजतात. कारवार आणि मंगरूळ जिल्ह्यात एका आदिवासीच्या विवाहसोहळ्यात पाच सुवासिनी मातीचे घडे करून आधी नदीवर जाऊन गंगेची पूजा करतात. त्या घड्यातील पाणी विवाहाच्या वेळी देवासमोर ठेवून वधू-वरांना हळद लावताना एका खांबाला उंबर आणि कडुलिंबाच्या डहाळ्या बांधतात आणि त्या खांबाभोवती वधू-वराला खांद्यावर घेऊन पाच फेऱ्या मारतात. एका परीने हीदेखील विवाहातील वृक्षपूजाच म्हणावी लागेल.

प्राचीन काळापासून चालत आलेली ही वृक्षपूजा आजही थोड्याफार प्रमाणात आपल्या संस्कृतीत व विशेषतः आदिवासी संस्कृतीत पाहावयास मिळते. या पूजेला पाप-पुण्यात्मक महत्त्व असो-नसो, धार्मिक विधीतील त्याचा प्रतीकात्मक वापरही आज निरर्थक वाटत असेल. तरीही आजचा अभ्यासक असे सांगतो की, आपल्या श्वासासाठी, आपल्या घासासाठी, आपल्या उन्नयनासाठी नि तृप्त जीवनासाठी वृक्षलागवड आवश्यक गोष्ट झालेली आहे. एक वृक्ष त्याच्या साठ वर्षांच्या आयुष्यात मानवाला सुमारे चौदा लाख रुपयांची देणगी या ना त्या प्रकारे बहाल करीत असतो. त्यासाठी तरी त्याची आपण पाद्यपूजा केली पाहिजे. आपल्या जगण्यासाठी तरी वृक्षपूजा-वृक्षोपासना अत्यंत आवश्यक झालेली आहे, यात शंकाच नाही.

■ ■ ■

माणसाची शक्ती आहे. या निष्ठेची आज आवश्यकता आहे. ही निष्ठा म्हणजेच लोकनिष्ठा. बुद्धीचा उपयोग जो करू शकतो, बुद्धीच्या शक्तीवर ज्याचा विश्वास आहे, तोच लोकनिष्ठेने हे लोकतंत्राचे, लोकशाहीचे अधिष्ठान आहे.

आज आपण असे बघतो की, ज्याच्याजवळ संपत्ती आहे, धन आहे तो लोकशाहीला विकत घेण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि ज्याच्याजवळ दंडुका आहे, तो लोकशाही आपल्या वळणावर कशी येईल, या दृष्टीने माणसाला वळवण्याचा प्रयत्न करीत आहे. या तीन शक्तीची प्रतिष्ठा जोपर्यंत आहे. तोपर्यंत औपचारिक लोकशाहीच्या ऐवजी जिला आपण वास्तविक लोकशाही म्हणतो या वास्तविक लोकशाहीची स्थापना होऊ शकणार नाही आणि वास्तविक लोकशाहीची स्थापना कोण करणार, हा मुख्य प्रश्न आहे. आतापर्यंत लोकशाहीची स्थापना ज्यांनी केली त्यांच्यादेखील विचारात, त्यांच्या मनोवृत्तीत लोकांना फारच अल्प स्थान होते. लोक म्हणजे कोण? आपल्याला काय हवे हे ज्यांना कळत नाही त्यांचे नाव लोक. त्यांना जे हवे ते आम्हाला कळते. त्यामुळे त्यांना जे हवे आहे ते त्यांच्याकरिता आम्ही मिळवावे आणि नंतर ते बळजबरीने त्यांच्या गळी उतरवावे. ही आजपर्यंतच्या क्रांतिकारांची भूमिका. समाजपरिवर्तन करणारा जो वर्ग असेल, त्याची ही भूमिका. लोकांची समजूत घालून त्यांना जर आपल्याला वळणावर आणता आले तर ठीक आहे, तसा प्रयत्न आम्ही करू, पण ते जर आपल्याला करता आले नाही तर त्यांच्या मताची पर्वा न करता, त्यांच्या इच्छेची तमा न बाळगता, त्यांना जे इष्ट आहे आणि त्यांच्याकरिता जे हितकार आहे ते त्यांच्यावर लादण्याचा आम्ही प्रयत्न करू. ही भाषा सर्वत्र आपल्याला ऐकू येते. समाजपरिवर्तन करणारी माणसे मूठभरच असतात, जास्ती नसतात. पण ही समाजपरिवर्तन करणारी माणसे असतात, या माणसांच्या समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत लोकांच्या पुरुषार्थाला कितपत वाव आहे, हा मुख्य प्रश्न आहे. समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत लोकांचा प्रत्यक्ष भाग किती? सक्रिय भाग किती? आणि यावर आजच्या क्रांतीची प्रक्रिया अवलंबून आहे.

क्रांतिकारक हा जर कुठल्याही प्रकारची- हिंसक असो, अहिंसक असो, सशस्त्र असो, नि:शस्त्र असो, कुठल्याही प्रकारची- सेना उभारू लागला तर त्या सेनेला एक शिस्त लागते आणि शिस्तीला एक गोष्ट आवश्यक असते. विचार ज्या मानाने कमी असेल, शिस्त त्या मानाने जास्त शिस्तीला एकसूत्रीपणा लागतो. एकसूत्रीपणाचा अर्थ असा आहे की, सगळ्यांनी विचार करता कामा नये. एका शिपायाची गोष्ट सांगतात : हा शिपाई एकदा जखमी होऊन दवाखान्यात गेला. डॉक्टरांनी त्याच्या मेंदूचे ऑपरेशन केले. चुकून तो मेंदू त्याच्या कवटीत परत ठेवायला डॉक्टर विसरले. शिपाई

तसाच घरी निघून गेला. नंतर डॉक्टरांच्या लक्षात आले. मग पत्र पाठविले की, तुझा मेंदू चुकीने राहून गेला आहे. तू परत आलास तर फिरून तुझ्या कवटीत मी तो व्यवस्थित बसवून देईन. शिपायाने लिहिले की बरेच झाले. माझ्या लक्षातदेखील आले नाही. पूर्वीच्यापेक्षा आता मी सुखी आहे तो मेंदू नसल्यामुळे. असे सांगतात की नेपोलियन म्हणाला होता, की जो विचार करू शकत असेल तो शिपाई बनू शकत नाही आणि म्हणूनच आपल्याला माहीत असेल, सैन्यातल्या शिपायाला दारू पाजण्याची पद्धत आहे. त्याची विचारशक्ती मंद व्हावी, कुंठित व्हावी हा त्यातला हेतू. विचार करू लागला, की तो शिपाई राहूच शकत नाही. कार्डिनल ह्यूमन म्हणून एक मोठा निबंधकार झाला. फ्रांसमध्ये त्याने नेपोलियनसंबंधाने एक निबंध लिहिला. त्यात असे लिहिले : त्याला बंदुकीत जी दारू असते, तिचे व्याकरण फक्त येत होते. दुसरे व्याकरण काही कळत नव्हते. पण नेपोलियन स्वत: काय म्हणतो : 'एक हजार तरवारीपेक्षा आपल्याविरुद्ध लिहिणारे एक वर्तमानपत्र जास्त भयंकर आहे.' आज आपण बघतो, जिथे जिथे समर्थ हुकुमशाही असेल तिथे भिन्न विचाराला थारा नसतो. राज्यकर्त्याच्या विचाराहून निराळा, भिन्न विचार व्यक्त होऊ नये, हा सगळ्या हुकुमशहांचा प्रयत्न आहे. त्यांना तलवारीची, शस्त्राची भीती विचाराइतकी वाटत नाही. विचाराची जास्त भीती वाटते. विचारात तलवारीपेक्षा जास्त शक्ती आहे, याचे हे प्रत्यंतर आहे. तलवारीत जर जास्त शक्ती असती तर सगळे हुकुमशहा शस्त्रधाऱ्यांना भ्याले असते. आज हुकुमशहा शस्त्रधाऱ्यांना भीत नाहीत. ज्याच्याजवळ विचार असेल त्याची मात्र भीती वाटते. त्या व्हॉल्टेअरच्या संबंधाने एक आख्यायिका आहे. पॅरिस शहरात जो आपल्या घोडागाडीत बसून जाऊ लागला. ऑक्ट्रायच्या नाक्यावर जो चौकीदार होता तो डोकावून त्याच्या गाडीत बघू लागला. म्हणाला, ''बघतो आहे की, तुमच्याजवळ ज्याच्यावर कर लागू शकेल अशी काही वस्तू आहे का?'' व्हॉल्टेअर फार थट्टेखोर होता, विनोदी होता. मिस्कीलपणाने म्हणाला, ''माझ्याखेरीज या गाडीत ज्याच्यावर कर लागू शकेल असा कुठलाही जिन्नस नाही. एकटा मीच असा आहे. माझ्या डोक्यातला विचार आज जे सत्ताधारी लोक आहेत, त्यांच्या विचाराहून भिन्न आहे.''

म्हणून मला आपल्याला असे सांगायचे आहे की, विचारात भेसळ होऊ देता कामा नये. भेसळ नको याचा अर्थ, एकाच विचाराला आपण पकडून ठेवले पाहिजे असा नव्हे. एका विचाराला जो पकडून ठेवतो त्याला विचारच करता येत नाही. भेसळ होऊ देऊ नये याचा अर्थ एवढाच, कुठल्याही विभूतीच्या तत्त्वज्ञानाशी, विचाराची भेसळ होऊ देता कामा नये. विचार निरपेक्ष आहे. मी आपल्या विचाराची स्वत:च्या जीवनाशी गल्लत करण्याचा प्रयत्न केला नाही, त्यामुळे विचार करू शकतो.

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Ta. Daryapur, Dist. Amravati

B.A.III (Sem 6)

४. बैलाचा मृत्यू

– *वसंत आबाजी डहाके*

परिचय : वसंत आबाजी डहाके (जन्म : १९४२)

वसंत आबाजी डहाके हे साठोत्तरी मराठी कवितेतील अस्तित्ववादी जाणिवेची परिपक्व अभिव्यक्ती करणारे एक महत्त्वाचे कवी म्हणून परिचित आहेत. त्यांनी मुंबई येथील एल्फिन्स्टन महाविद्यालयामध्ये मराठी विषयाचे अध्यापन केले. वसंत आबाजी डहाके यांचे 'योगभ्रष्ट', 'शुभवर्तमान', 'शुनःशेप', 'चित्रलिपी' हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. 'अधोलोक', 'प्रतिबद्ध आणि मर्त्य' या कादंबऱ्या, 'यात्रा-अंतर्यात्रा' हा चिंतनात्मक ललित लेखसंग्रह, 'कविता म्हणजे काय?', 'समकालीन साहित्य', 'उपयोजित समीक्षा', 'कवितेविषयी', 'नवसाहित्य आणि नवसाहित्योत्तर साहित्य' इ. समीक्षा ग्रंथासह 'निवडक कविता' आणि 'निवडक सदानंद रेगे' इ. संपादित ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. 'चित्रलिपी' या काव्यसंग्रहासाठी त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. चंद्रपूर येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांना बहुमान मिळाला आहे.

प्रस्तुत कवितेतून उतारवयातील एकाकीपण प्रत्ययास येते.

एखाद्या बैलाच्या नशिबात
चिखलात रुतून राहणं येतं,
एखादा शेतांतून येता येता
मध्येच रस्त्यात बसून राहतो :
बैल थकला की असं होतं.

मग घरातलं सर्वात धाकटं पोर,
पाण्यानं भरलेली बादली
आणि हिरव्या चाऱ्याची एक पेंडी
–ज्यासाठी आयुष्यावर सबंध
जू ओढवून घेतलं होतं–
त्याच्या सोबतीला दिवसभर.

हें बैलाला जगवणं नसतं;
तें आपल्याच शेवटच्या दिवसाची
तयारी करणं.

संध्याकाळी बैल एकाकी असतो.
पिकांवर उतरणाऱ्या त्या उदास उजेडात
त्याच्या डोळ्यांतलं पाणी चमकतं.
अंधाराच्या विरल पडद्याआड
एखादं घुबड ओरडतं.
तो आवाज हाच आता शेवटचा सोबती.
गाव पुढे आहे... त्याचं कांही नाही,
शेत मागेच राहून गेलंय...

■ ■ ■

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

B. A - III (Sem 6)

''न्हव आप्पा. हातंपाय गळल्यागत झालंय ते काय घडलंय म्हणून न्हवं. आपलं उगच मनाला काच लागतीया. सगळं आभाळ भरून आल्यावर कसं अंधारल्यागत वाटतंय. पुढचं काय दिसंना. पण उगाच वाटतंय की मनाला.''

एवढं बोलून त्यानं आप्पाच्या तोंडाकडं पाहिलं. आतनं बाहेर येताना तिनं सारं ऐकलं होतं. चार हात दूर उभी राहून तिनं काळजीचा सुरू काढला,

''बरं नसंल तर लवंडा इळभर-''

''व्हय. लवंड जा इळभर-''

आणि एवढं बोलून आप्पा जागचा उठला. हळूहळू आपल्या खोपीच्या वाटेनं दिसेना झाला.

''काय हुतंय सांगा तरी-''

''काय बी होत न्हाई.''

''मग असं का? उंबऱ्याच्या कडेला नीट बसत तिनं हाताचा मुटका गालाला टेकविला.''

''असं म्हणजे?''

''आता मलाच विचारा! रात्रीचं झोप न्हाई म्हणतासा. खायला बसलं की भूक न्हाई म्हणून उठतासा झालंय तरी काय म्हणावं?''

त्यानं बायकोच्या तोंडाकडं पाहिलं. नाकेली, ठसठशीत असलेली बायको त्याला खूप आवडली होती. त्यानंतर किती उन्हाळे-पावसाळे संपले...

''मला कायबी कळंना ग-''

बायको ठसक्यानं उठली. तिचं नाक आणखी तिखट झालं.

''दुखलं खुपलेलं ज्येचं त्येला चांगलं कळतंय! तुम्हांला नसंल सांगायचं तर न्हाऊ द्या की-''

आणि एवढं बोलून ती तरतरत आत वळली.

ती गेली तिकडं त्यानं नुसतं वळून पाहिलं. आतल्या घरात नेहमीचा अंधार. ओल आल्यानं बुरसटल्यागत झालेल्या भिंती. खुंटाळीला लोंबणारे कळकट कपडे. मनात खूप साचून आलं होतं. वाटत होतं- ते सारं घडघड ओकावं.

खरंतर बायकूच कराया नको होती! अरं, बायकू म्हणायचं का सोंग! या हिच्यापायी तर अशी गत झाली. माघारी का होईना, लोकांचं बोलणं केव्हातरी कानावर पडतंच की. काय म्हणे तर बायकोच्या बोटावर नाचतोय. सारं करते ती बायकू. ती सांगेल त्या आणि तितक्या उठाबशा. बाईलवेडा! आयला मी! तरी सहन केलंच की. अगदी डोळे मिटून. आवंढा गिळून. आणि बोलणाऱ्याचं तरी काय चुकलं

म्हणावं? बायको केली, ती स्वतःच्या मर्जीनं. दिसायला गोरी, बरी वाटली म्हणून केली. म्हणून काय चूक झाली? मग बायकोनं असं का करावं? एका ठिकाणी तिला खपेना झालं. वर्ष-सहा महिन्यांतच धुसपूस सुरू झाली. सासू-सुना एवढ्यातेवढ्या कारणानं भांडाय लागल्या. हातातलं भांडं आपटू लागल्या. तुझं-माझं चालू झालं. म्हातारा-म्हातारी एका बाजूला धाकल्याची बायको एकीकडं आणि ही माझी बायकू एकीकडं. झालं का! आता आली का पंचाईत घराबाहेर बरं वाटायचं. पण दारात पाय टाकलं की कावकाव चालू व्हायची... आता लग्नाची बायकू टाकून चालंल? आणि समजा टाकलं- पोरांचं काय करायचं? अरं, एवढी एवढी होती ही पोरं. हप्पा दे म्हणायची. नाकात शेंबूड गळायचं, पण तरी पोरांना बघून बरं वाटायचं. पुनः पाय गोत्यात. मी म्हटलं, ती म्हणते तर वेगळंच राहावं. वेगळं राहून तरी डोकं ठिकाणावर राहील वाटलं. पण, धाकट्यानं माझं ऐकलंच नाही. (लई माजोरी लेकाचा!) हजार कावळ्यांनी काव काव करावी न् डोस्कं उठवावं, तसं झालं घरात. पटकन वाटण्यांचं ठरलं. वाटण्या झाल्या. वेगळं घर मिळालं. डोळं मिटून गप्प उभा राहिलो. म्हातारी, म्हातारा धाकल्याजवळच राहिली. का रं? मी तुमचा लेकरू न्हवं?

घराच्या, आईवडिलांच्या आठवणीनं त्याचं मन भरून आलं. ढगावर ढग आपटावेत तसं आतल्या आत खूप मोठी वावटळ उभी भिरभिरत होती. मनाला काच लागली होती. इतक्या दिवसांत म्हाताऱ्यानं का ढुंकून बघू नये असं वाटत होतं रक्ताची माया अशी आटली कशानं? असा एकच विचार त्याच्या डोक्यात घुमू लागला आणि एकाएकी त्याचे डोळे भरून आले. आठवणींची वाट आणखी मोकळी पण जड होत गेली... ढग नुसतेच खालीवर उन्मळून फुटावेत, तशी त्याच्या मनाची गत झाली.

न्हवं- आजच असं काय घडलं म्हणून हा इतका गोंधळ मनात माजलाय म्हणावं! का, आयुष्यात एक दिवस येतोच केव्हातरी...

तो जागचा उठला. आतल्या अंगाला एका कोपऱ्यात लवंडला. अगदी तोंडावरचं पांघरूण घेऊन गुडूप निजला. त्यानं डोळे मिटले. डोळ्यापुढनं तांबड्या-पांढऱ्या रंगाची झालर फिरत राहिली. मन पुनः भरून आलं. डोळ्यांना नकळत धार लागली आणि पांघरुणाखालचं हाडामांसाचं शरीर गदगदत राहिलं.

खूप वेळानं त्याचं पोरगं आलं आणि ''बाबा, बाबा'' म्हणत त्याच्या अंगाव पडलं. त्यानं त्याचा मुका घेतला. पोरगं बाहेर पळालं. त्याला उठावं वाटलं म्हणून तं उठला. आत जाऊन त्यानं चुळा टाकल्या. नाक शिंकरलं. तोंड पुसत तो बाहेर आला

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati
Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Dary... Dist. Amravati

B.Com I (Sem I)

प्रॉटेस्टंट, हिंदू आणि मुसलमान, शिया आणि सुन्नी, ब्राह्मण आणि अब्राह्मण, स्पृश्य आणि अस्पृश्य, A religion which refuses to establish fellowship between man and man is bound to fall in estabilishing fellowship betwen man and the God. जो धर्म माणसामाणसांत भाईचारा निर्माण करायला असमर्थ आहे तो माणूस आणि देव यांच्यात नाते कसे सांधणार? मी साशंक आहे. तुमचा धर्म कोणता आहे?– युवाधर्म. जो दुसऱ्यांसाठी जगण्याचे शिकवतो, तो माझा धर्म आहे. To live for others. It is good to get, but better to give and giving is growing and there is no growth without prunning. घेणे चांगले, पण देणे त्याहून श्रेयस्कर. आणि देण्याचा अर्थ आहे– विकास करणे. छाटणी केल्यावाचून विकास होत नसतो. द्राक्षवेलींची छाटणी होते, मगच त्यांची वाढ होते; द्राक्षांचे घोस बहरतात. दोस्तहो, religious dogma धार्मिक मतांधता आम्हांला कुठेच नेऊ शकणार नाही. चालण्याची शक्ती आमच्याय पायांत आली पाहिजे. आपला विश्वास स्वत:वरच असला पाहिजे. आज विश्वास ठेवला जातो– ग्रंथावर, धर्मावर, ज्याला कधी कुणी पाहिले नाही अशा देवावर. इंग्रजीत म्हण आहे : As secured as the baby in the womb – गर्भाशयात मूल जसे सुरक्षित असते तसे. पण, नऊ महिन्यांनंतर ते मूल बाहेर यायची कोशीस करते. त्याचे पालनपोषण करणाऱ्या आईला किती वेदना, किती चिंता वाहाव्या लागतात. New life is never born without labour-pain. प्रसूतिवेदना सहन केल्यावाचून नूतन जीवन कसे जन्मणार?

साने गुरुजींनी 'आंतर भारती' शब्द आपल्या हृदयीच्या सर्व सद्भावना एकवटून दिला. तो शब्द, ती भावना एकतेचा राजमार्ग आहे. Sane Guruji drained the udder of his heart by the word Antar Bharati, Friends, it is the blue print of unity. मी ब्राह्मण, मी देशमुख, मी मराठा, मी शीख, मी पंजाबी, मी तमिळ, मी बंगाली, मी तेलुगू– हा विचार मग मनात का येतो? का यावा? हा प्रश्न विचारता विचारताच साने गुरुजी प्राणांची कुरवंडी करून गेले. Defeated prophet पराभूत प्रेषित बनून गांधीजी एकटे नौखालीत गेले. विनोबाजी सूक्ष्मात प्रवेशिले. महात्म्यांना कळले की, हे दु:खाचे धर्मचक्र भोवऱ्यासारखे घुमत असते. जितकी जास्त गती तेवढे ते स्थिर भासते. म्हणून महात्म्यांचे, प्रेषितांचे चित्त भंग पावत नसते. With a view to stay at one place in the era of science man has to move with the greatest speed. विज्ञानयुगात एका जागी ठाकण्यासाठीसुद्धा मोठ्या वेगाने पुढे जावे लागते!

रचनात्मक संघर्षासाठी तरुणाईने अविलंब तयारी करायला हवी. जेव्हा वृक्षाची मुळे जमिनीत चांगली खोलवर रुजवतात, पसरतात, तेव्हा त्याच्या फांद्या धरतीवर विस्तारतात. रचनात्मक कार्याचा अर्थ असा भूमीत रुजून, मुळे खोलवर पसरवून, जीवनरस प्राप्त करणे. मदर रूट– सुर्माची ताकद जेवढी, त्याची भूमीत विस्तारण्याची शक्ती जेवढी, त्या प्रमाणात वृक्ष मोठा होतो, बहरतो, पसरतो. कितीएक घोटीव दगडांच्या चिऱ्यांतून, त्या पत्थरांचे स्नायू चिरीत तो अंकुर आत पसरतो. ही मुळे केसाहूनही नाजूक, तंतूसमान, मुलायम असतात. पण किती दुरून, किती गहराईतून ती जीवनरस शोषून आणतात; वृक्षाला पुरवतात. वृक्षांच्या मुळांतली ही ताकद आपण समजून घेतली पाहिजे. ही ताकद ज्या वेळी तुम्ही जाणून घ्याल त्या वेळी श्रेयाला, साहसाला आलिंगन देता येईल. रचनात्मक क्रांती ज्यांना करायची आहे त्यांनी हा बीजमंत्र जाणून घेतला पाहिजे.

(उज्ज्वल उद्यासाठी)

■ ■ ■

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

B-Com I (Sem I

विषमता हा जातिव्यवस्थेचा दुसरा दुष्ट परिणाम आहे. प्रत्यक्षात दोन जातींतील उत्तेजना आणि प्रतिसाद हे मुळातच एकांगी आहेत असे दर्शविते. उच्च जातींनी एका ठरावीक पद्धतीने वागावे आणि खालच्या जातींनी एका रूढ झालेल्या पद्धतीनेच प्रतिसाद द्यावा. याचा अर्थ असा, की विविध जातींना प्रोत्साहनाची आणि त्यानुसार प्रतिसाद देण्याची समान संधी उपलब्ध नसल्याने, परिणामत: यामुळे काहींना मालक होण्याचे शिक्षण मिळते, तर इतरांना गुलाम होण्याचे शिक्षण मिळते. जीवनातील विविध अनुभवांच्या मुक्त आदानप्रदानाला प्रतिबंध केल्यामुळे प्रत्येक घटक त्याच्या नैसर्गिक अधिकाराला मुकतो. यामुळे विशेषाधिकार असणारे आणि नैसर्गिक अधिकार हिरावून घेतलेले असे दोन वर्ग समाजात निर्माण होतात. असे विभाजन, सामाजिक अभिसरणाला (Social Endosmosis) प्रतिबंध करते.

जातिव्यवस्थेच्या तिसऱ्या वैशिष्ट्याचा दुष्टपणा असा की, ते लोकशाहीची मुळेच निखंदून टाकते. प्रत्येक जात एका विशिष्ट व्यवसायाला बांधलेली असते. प्रत्येक व्यक्ती इतरांना उपयुक्त होईल अशा पद्धतीने, स्वत:च्या नैसर्गिक आवडीनिवडीप्रमाणे व्यवसायाची निवड करीत असेल, तर त्यामुळे निश्चितपणे समाज सुसंघटित रीत्या स्थिर राहील. अशा प्रकारच्या आवडी-निवडींचा शोध घेणे आणि समाजोन्नतीसाठी त्या दिशेने त्यांना घडविणे हे समाजाचे कर्तव्य आहे. परंतु, प्रत्येक माणसात क्षमतेची आणि कृतिशीलतेची अमर्याद विविधता असते, जी त्या-त्या व्यक्तीला घडवू शकते. लोकतांत्रिक स्वरूप असलेल्या समाजाने व्यक्तीतील सर्व क्षमतांना मार्ग मोकळा करून द्यायला हवा. स्तरीकरण हे व्यक्तिविकासाला खुंटविते आणि जाणीवपूर्वक केलेली खुंटविण्याची प्रक्रिया लोकशाहीला हेतुपुरस्सर नकार देते.

जातिव्यवस्था कशी संपविता येईल? पहिला अडथळा म्हणजे जातिव्यवस्थेचा प्राण असलेली श्रेणीबद्ध विषमता होय. जेव्हा लोक उच्च आणि निम्न अशा दोनच वर्गांत विभागलेले असतात, तेव्हा वरच्या वर्गाशी संघर्ष करण्याच्या उद्देशाने निम्न वर्गाला संघटित होणे सोपे जाते. परंतु येथे निम्न जातीचा एकच वर्ग नाही. हा वर्ग निम्न आणि अतिनिम्नांचा असतो. निम्न हे अतिनिम्नांसोबत संघटित होऊ शकत नाहीत. निम्नाला अशी भीती वाटत असते की, जर तो अतिनिम्नाचा स्तर उंचविण्यात यशस्वी झाला तर त्याला आणि त्याच्या जातीला समाजात असलेले वरचे स्थान गमवावे लागेल.

दुसरा अडथळा असा, की आपले समाजहित कशात आहे हे ओळखता न. आल्यामुळे एकत्रितपणे कृती करण्याच्या प्रसंगी भारतीय समाज पंगू ठरतो. प्लेटोने

म्हटल्याप्रमाणे, सामाजिक संघटन अंतिमत: जीवित माध्यांच्या जाणिवेवर अवलंबून असते. जर आपण आपल्या माध्यांबद्दल अनभिज्ञ असू, आपले हित कशात आहे हे जर आपणास माहीत नसेल, तर सर्व बाबींसाठी आकस्मिकता आणि लहरीपणा यांच्या कृपेवर अवलंबून राहावे लागेल. जोपर्यंत आपल्याजवळ सुपरिणामाबाबत बुद्धिवादी निर्णयाचे निकष नसतील, (तोपर्यंत) कोणत्या शक्यतांना आपण चालना द्यावी हे आपल्याला ठरविता येणार नाही. प्रश्न असा आहे की, न्याय्य आणि एकजिनसी समाज निर्माण करण्याच्या ध्येयप्राप्तीच्या मार्गातील जातिबद्ध रचनेचा अनुलंघनीय अडथळा दूर केल्याशिवाय भारतीय समाज हे ध्येय साध्य करू शकेल काय? जातिबद्ध समाजरचना अस्तित्वात असताना एकजिनसी समाज निर्माण होणे शक्य आहे काय? चुकीचे मूल्यमापन आणि चुकीचे वास्तवदर्शन यामुळे सर्व भारतीयांच्या मनात गोंधळ उडालेला आहे आणि त्यांना चुकीच्या दिशेने नेले आहे. असंघटित आणि खंडित समाज विविध प्रकारची प्रारूपे आणि प्रमाणे यांनी निर्धारित असतो. अशा परिस्थितीत जातीच्या प्रश्नामुळे प्रत्येक भारतीयाला मनाची सुसंगतता प्राप्त करणे अशक्यप्राय झाले आहे.

शिक्षणामुळे जातींचा विध्वंस होऊ शकतो काय? याचे उत्तर 'होय' त्याचप्रमाणे 'नाही' असे आहे. आज जे शिक्षण दिले जाते तेच जर दिले जाणार असेल, तर त्या शिक्षणाचा जातीवर काहीच परिणाम होणार नाही. ती ज्या स्वरूपात आहे त्याच स्वरूपात राहील. ब्राह्मण जात याचे ज्वलंत उदाहरण आहे. तिच्यातील शतप्रतिशत शिकलेले आहेत. नव्हे, तिच्यातील बहुसंख्य उच्चशिक्षित आहेत. असे असताही एकही ब्राह्मण जातीविरुद्ध असल्याचे दिसत नाही. वास्तविकता अशी आहे की, वरच्या जातीतील शिक्षण घेतलेल्या माणसास, शिक्षण घेण्यापूर्वीच्या अवस्थेच्या तुलनेत शिक्षण प्राप्त केल्यानंतर जातिव्यवस्था टिकून राहावी, असे प्रकर्षाने वाटत असते. कारण हेच शिक्षण त्याला मोठे पद उपलब्ध होण्याची अधिकची संधी देत असल्यामुळे, जातिव्यवस्था कायम ठेवण्यासाठी तो अधिक रुची घ्यायला लागतो. या दृष्टीने पाहता जातिव्यवस्था समाप्त करण्यासाठी शिक्षण उपयुक्त साधन ठरत नाही. ही झाली शिक्षणाची नकारात्मक बाजू. (त्या उलट, शिक्षणाची नकारात्मक बाजू म्हणजे) भारतीय समाजाच्या खालच्या स्तरातील लोकांना शिक्षण दिले, तर हे शिक्षण जातिव्यवस्थेला विरघळवून टाकेल. ते त्यांच्यात बंडखोरीची प्रवृत्ती निर्माण करील. त्यांच्या सद्य:परिस्थितीतील अज्ञानामुळे, ते जातिव्यवस्थेचे समर्थक बनलेले आहेत. एकदा त्यांचे डोळे उघडले तर ते जातिव्यवस्था नष्ट करण्यासाठी उद्युक्त होतील.

वर्तमान धोरणातील प्रमुख दोष असा की, शिक्षण हे मोठ्या प्रमाणावर दिले जात असले तरी भारतीय समाजाच्या वाजवी वर्गातील लोकांना दिले जात नाही. भारतीय

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

बालकं बालकामगार म्हणून बळी पडत आहेत आणि बालविवाहाचे शिकार बनत आहेत.

माझ्या एका चांगल्या मैत्रिणीची दु:खद गोष्ट सांगते. माझ्या वयाची हिंमतबहादर मुलगी होती. डॉक्टर होण्याचं स्वप्न पाहायची; पण तिचं स्वप्न हे अधुरं स्वप्नच राहिलं. घरच्यांनी बाराव्या वर्षी जबरदस्तीनं तिचं लग्न केलं. चौदाव्या वर्षी ती आई बनली. मला मात्र खात्री होती, माझी ही मैत्रीण एक चांगली डॉक्टर झाली असती, पण हे झालं नाही, कारण ती एक मुलगी होती. तिच्या या गोष्टीमुळेच मी माझ्या नोबेल पारितोषिकाची रक्कम 'मलाला फंडास' अर्पण करीत आहे. तिच्यासारख्या मुलींच्या चांगल्या शिक्षणासाठी या पैशाचा उपयोग व्हावा.

मी जगभरातील नेत्यांना आवाहन करते. आमच्या या कामासाठी मला, मेझून, अमिना या सगळ्यांना आपण मदत करा. माझ्या या पारितोषिकाच्या रकमेतून मी माझ्या खेडेगावातील शाळा व स्वातमधील शाळा बांधणार आहे.

माझ्या गावी आजही मुलींसाठी माध्यमिक शाळा नाही. माझ्या मैत्रिणींसाठी मी ती बांधणार आहे. यामुळे त्यांची शिक्षणासंबंधीची स्वप्नं पूर्ण होऊ शकतील.

ही माझी सुरुवात असेल, एवढ्यावरच मी थांबणार नाही. प्रत्येक मूल शाळेत गेलं पाहिजे, इथंपर्यंत हे काम सुरू राहणार आहे. माझ्यावर झालेल्या हल्ल्यानंतर माझी हिंमत वाढली, असं मला वाटू लागलं. माझ्या आतला आवाज मला सांगत आहे की, या कामापासून कुणीही मला, आम्हाला थांबवू शकणार नाही. याच कारणाने आज हजारो माणसं या कामासाठी एकत्र आली आहेत.

प्रिय बंधू आणि भगिनींनो, मार्टिन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला, मदर तेरेसा, आँग सान सू कीसारख्या महान व्यक्तींनी हा परिवर्तनाचा बदल आणला आहे. या थोर व्यक्ती या व्यासपीठावर येऊन गेल्या आहेत. आदरणीय कैलाश सत्यार्थी आणि माझा हा जो प्रवास आहे, त्यामुळेही दीर्घकाळ टिकणारा बदल घडून येणार आहे.

माझी मनापासूनची ही कळकळ आहे. आपल्या मुलाच्या शिक्षणासाठीची ही शेवटची लढाई आपण लढावी. आपण सर्वांनी एकत्र येऊन या कार्यास मदत करावी. यातूनच सगळ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटू शकेल.

मुलांच्या शिक्षण हक्काविषयी आम्ही काही पावलं चालले आहोत; पण आता त्याकरिता झेप घेण्याची आवश्यकता आहे. जगातल्या सर्व नेत्यांना शिक्षणाचं महत्त्व सांगण्याची ही वेळ नाही; कारण त्यांना हे नम्र आवाहन आहे की, त्यांनी आता सर्वांच्या शिक्षणासाठी कृती करावी.

जगभरातील नेत्यांना विनंती आहे की, एक व्हा आणि शिक्षणासाठी अग्रक्रम द्या. पंधरा वर्षांपूर्वी जगभरातील प्रमुख नेते एकत्र आले. ग्लोबल गोल्ससंबंधी निर्णय

घेतला. गेल्या काही वर्षांत याची प्रगती झाल्याचे दिसून आले. शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांसाठीचे काम सुरू झाले, पण पुढे अर्धेच राहिले. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर भर दिला गेल्यानं, शिक्षणातील प्रगती सर्वांपर्यंत पोहोचू शकली नाही.

येत्या वर्षात, २०१५ साली, शिक्षणासाठी कार्य करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाचे कार्यकर्ते भेटत आहेत. चिरंतन प्रगतीचं लक्ष्य गाठण्यासाठी चर्चा करणार आहेत. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या जगातील नव्या पिढीच्या भवितव्यांचा ते आराखडा तयार करणार आहेत. या क्षेत्रातील नेत्यांना आवाहन आहे की, त्यांनी जगभरातील मुलांसाठी दर्जेदार मोफत प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

याबद्दल काही जण म्हणतील, हे अशक्य कोटीतलं आहे, खर्चीक आहे आणि त्याहूनही अवघड काम आहे; पण हीच वेळ आहे, जगानं मोठी झेप घेण्याचा विचार केला पाहिजे.

प्रिय बंधू आणि भगिनींनो,

मोठ्या माणसांच्या लक्षात येत असेल; पण आमच्यासारख्या मुलांना मोठ्या माणसांचं वागणं समजत नाही. शक्तिशाली देश युद्ध व्हावेत म्हणून प्रयत्न करताना दिसत आहेत; पण भांडणाऱ्या देशांत शांतता नांदावी म्हणून काहीच का करत नाहीत? बंदुका, बॉम्ब देण्यापेक्षा पुस्तकं देणं त्यांना अवघड का वाटतं? रणगाडे बांधणं त्यांना सोपं वाटावं, मात्र शाळा बांधणं कठीण व्हावं?

आम्ही एकविसाव्या शतकात राहतो. हे आधुनिक जग आहे. आमचा विश्वास आहे की, या काळात कोणतीही गोष्ट अशक्य कोटीतली नाही. आम्ही चंद्रावर पोहोचत आहोत. लवकरच दुसऱ्या ग्रहावर उतरू. अशा एकविसाव्या शतकात आम्ही निर्धार करावयास हवा की, सर्वांसाठी चांगल्या शिक्षणाचं आमचं स्वप्न साकार होऊ शकेल.

याकरिता समता, न्याय आणि शांतता सर्वांना मिळो. यात राजकीय व्यक्ती, सर्व क्षेत्रातील नेते यांचा सहभागाचा वाटा असणार आहे. यात मी, तुम्ही असणार आहात आणि आपणा सर्वांचं ते कर्तव्य आहे.

चला तर बंधूंनो, आपण सुरू करूया. आता वाट बघायची नाही. जगभरातील माझ्या भाऊ-बहीण असलेल्या मुलांना हाक देते. उठा! तयार व्हा! आणि कामाला लागा!

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

'आपलंच नाही राहिलं धड' असं म्हणून
अंथरूण घालून सांगत बसल्या एकमेकींचे
रात्रभर खंडले नाही डोळ्यांचे पाणी
कसं सांगू पोरी, तुपला बाप मेल्यापासून
मह्या वनवासाची कहाणी
पहाटे उठून निघाली
तिनं काहीच मागितलं नाही
'लेकरं वाट पहात असतील,
मला जाऊ दे बाई!'
थांब त्याला इचारते, माय म्हणताच
गळ्यात पडून 'तुला मही आण, त्याला नको सांगू काही
करमत नव्हतं वाटलं तुला भेटावं
म्हणून आले होते बाई'
तेव्हा माय म्हणाली
'अगं, सड्या हातानं कशी जात असं म्हणून
तिनं पदरात बांधून दिली आंब्याची कोय
लाव रानात, जाईल उन्हाळा
उद्या लेकरांना होईल सावलीची सोय'
मोडला उन्हाळा, पुढं आडमाप पडला पाऊस
कोयीचं झालं झाड, जगल्या इच्छा; उरली हौस
आता बारमाही आंब्याचा वानोळा माहेरी पाठविताना
तिची अमृताची माय डोळ्यांत गलबलून येते
पोटच्या पोरीला वाटी लावताना
त्याच आंब्याच्या कोया
तिच्या पदरगाठीत बांधून देते.

(अवकळा)

■ ■ ■

B.Com I (Sem I)

१६. कबीर

– *लोकनाथ यशवंत*

परिचय : लोकनाथ यशवंत रायपुरे (१९५६)

आंबेडकरी जाणिवांची अभिव्यक्ती करणारे कवी व अनुवादक. समाज व संस्कृतीच्या विविध रूपांचा शोध घेऊ पाहणारी वृत्ती त्यांच्या कवितेतून अभिव्यक्त होते.

'आता होऊन जाऊ द्या!', 'आणि शेवटी काय झाले?' व 'पुन्हा चाल करू या!' हे कवितासंग्रह प्रसिद्ध.

साधी व अर्थवाही रचना हे त्यांच्या काव्यलेखनाचे विशेष.

कवी मन्सूर एजाज जोश यांच्या 'आवाज़े जरस' या काव्यसंग्रहाचा त्यांनी केलेला 'जेरबंद' हा मराठी अनुवाद.

इंग्रजी, हिंदी व रशियन भाषांतून त्यांच्या अनेक कवितांचे अनुवाद प्रसिद्ध.

किरण मेश्राम यांनी अनुवादित केलेल्या 'आता होऊन जाऊ द्या!' या कवितासंग्रहाच्या 'ऐलान' या हिंदी अनुवादासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या पुरस्कारासह दमाणी पुरस्कार व अस्मितादर्श वाङ्मय पुरस्कार प्राप्त.

प्रस्तुत कविता ही एक आत्मचिंतनपर कविता असून समाजव्यवस्थेविरुद्धचा संताप व चीड त्यातून व्यक्त झाली आहे.

कबीर,
आपण जगण्यासाठी संपूर्ण नालायक आहोत
हे या व्यवस्थेने सिद्ध केले आहे पूर्वीच.

▭ ▭

मेणाच्या मनांना
जगाच्या भट्टीत भविष्य नाही,
हे दगडी सत्य नागवं पोरही सहज सांगते आपल्याला.

▭ ▭

कबीर,
आपण जगाच्या ज्या सुरेख कल्पना डोळ्यांच्या बाहुलीत रंगविल्या
त्या थट्टेचा विषय झाल्या आहेत खुलेआम.

▭ ▭

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

B.Com II (sem 4)

विभाग-क (कविता)

१. एक आम्ही असे निघालो-

– नारायण सुर्वे

परिचय : नारायण सुर्वे (१९२६-२०१०)

लहानपणापासून कवीच्या वाट्याला अत्यंत खडतर जीवन आले. अनाथ म्हणून जन्म. पुढे गंगाराम सुर्वे यांनी त्यांचे पालनपोषण केले. जीवनाशी झुंज, हॉटेलमध्ये वेटर, कापडगिरणीत डाफर, शाळेत शिपाई व पुढे शिक्षक म्हणून त्यांनी काम केले.

'ऐसा गा मी ब्रह्म', 'जाहीरनामा', 'माझे विद्यापीठ', 'सनद', 'नव्या माणसाचे आगमन' हे त्यांचे गाजलेले काव्यसंग्रह होत. साहित्यातील योगदानासाठी १९९८ साली त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने गौरविण्यात आले. १९९५ मध्ये परभणी येथे भरलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. संघर्षमय जीवनातील अनुभव, कठोर आत्मपरीक्षण यामुळे त्यांच्या कवितेला वेगळी धार असल्याचे दिसते.

प्रस्तुत कवितेतून कवीच्या वाट्याला आलेले जीवनानुभव प्रत्ययकारीरित्या प्रकट झालेले आहेत.

दर वळणावर आम्ही नवे मुक्काम करीत गेलो
एकाच जागी स्थिरावणे आम्हाला जमलेच नाही.

जोडलेले घर सोडताना ताकमेढ हळहळली
आम्हीही पाणावलो; उंबऱ्यात अडखळलो नाही.

स्वतःलाच शोधण्यात अर्धी उमर हरवून गेलो
स्वतःकडून लाखदा वळलो; तरीही आढळलो नाही.

असे आम्ही पुरे भणंग, झांजरवेळी वळताना...
बसावेसे वाटले, बसलो; उठताच, बसलो नाही.

प्रत्येक रात्र आत्म्याशी चर्चा करण्यात घालविली
एक आम्हीच असे निघालो; बेइमान झालो नाही.

२. झुंज

– सुरेश भट

परिचय : सुरेश भट (१९३२-२००३)

मराठीतील अग्रगण्य कवी आणि गीतकार. त्यांनी मराठी भाषेत गझल हा काव्यप्रकार रुजविला. त्यांच्या गझलेने साऱ्या महाराष्ट्राला वेड लावले. मृदुता, गेयता आणि तारुण्यसुलभ प्रणयभावनेचा आविष्कारही त्यांच्या काव्यलेखनाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या कवितेतून व्यक्त होणारी अन्यायाविषयीची चीड आणि माणुसकीची चाड महत्त्वाची आहे. त्यांची कविता सर्वसामान्य माणसाची होती. त्यामुळे रसिकांच्या हृदयाला हे शब्द थेट भिडायचे. मराठी भाषेच्या वैभवाचा त्यांना सार्थ अभिमान होता.

'रूपगंधा', 'रंग माझा वेगळा', 'एल्गार', 'झंझावात', 'सप्तरंग' इ. त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. गडचिरोली येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.

प्रस्तुत कवितेतून माणसाची जगण्याविषयीची झुंज प्रकट झालेली आहे.

हारण्याची खंत नाही, हारणे जिंकून जाई
आजची ही झुंज नाही– ही उद्याची हातघाई

जिंकणाऱ्यांनाच आता वाटते भीती जयाची
हारणाऱ्यांनी न केली बंद केव्हाही लढाई

जे सुळी गेले तयांची झुंजती अद्याप स्वप्ने
(वाचण्यासाठीच आता जिंकणाऱ्यांची बढाई)

जिंकणाऱ्यालाच अंती आठवे भाषा तहाची
हारणाऱ्याची न थांबे हारतांनाही चढाई

लावती प्रत्येक वेळी जिंकणारे जाहिराती
वाढते प्रत्येक वेळी हारणाऱ्यांची धिटाई!

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

प्रत्येक व्यक्तीला, समुदायाला, समाजाला, प्रत्येक दिवशी मन लावून कष्ट करूनच हे गुण मिळवावे लागले आहेत.

अमेरिकेत जेट युग एका कारखान्यात बनवलेलं नाही. आपण बारकाईनं पाहिलं तर लक्षावधी अमेरिकनांनी, लक्षावधी कौशल्यं मिळवून, लक्षावधी निर्णय घेऊन हे युग तयार केलं. मी 'मी तयार केलं' हा शब्द हेतुपुरस्सर वापरीत आहे. लहान-मोठे असंख्य शोध, लहान-मोठे असंख्य निर्णय, लहान-मोठ्या अनेक संघटना या माणसांच्या कर्तबगारीच्या सूक्ष्म पण बळकट तंतूतून हे जेट युगातल्या प्रगतीचं जाळं विणलं गेलं आहे. यात रहस्य नाही, जादू नाही किंवा ईश्वरी देणगी नाही. यात फक्त मानवी बुद्धी आणि मानवी श्रम आहेत.

या जेट युगात राहताना म्हणूनच मानवाचं स्थान महत्त्वाचं आहे. मानवानं अनेक उद्योग केले, अनेक कर्तृत्वं गाजवली म्हणून हे युग आलं. या युगाच्या जन्मासाठी लागलेला पैसा हाही माणसानं आपल्या कष्टांतून मिळवला. माणूस जसं आपल्या हातानं सौंदर्य निर्माण करतो तसंच त्या सौंदर्याचा आस्वाद जगाला देताना इतरांच्या जीवनात समाधान निर्माण करतो. माणूस यंत्र निर्माण करतो तेव्हा दुसऱ्याला ते वापरायला देऊन वापरणाऱ्याच्या जीवनात श्रम वाचवण्याचं समाधान निर्माण करतो. या सर्वांचा उपयोग तो जास्तीत जास्त लोकांना देतो आणि जास्तीत जास्त लोक त्याचा मोबदला देतात. संपत्ती अशा मार्गानं मिळते. संपत्ती वाम मार्गानंच मिळत असते हे म्हणणं सर्वस्वी चूक आहे. माणूस आपल्या कर्तृत्वानं ती कमावीत असतो.

म्हणून सामाजिक रचनेत जेव्हा व्यक्तीच्या कर्तृत्वाला महत्त्व द्यावयाच्या ऐवजी सांप्रदायिकतेला, अनुयायित्वाच्या संख्याबळाला महत्त्व मिळतं तेव्हा त्या समाजातला माणूस स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करू शकत नाही. कारण समाज त्याला तसं करू देत नाही.

ज्यांना असं वाटत असेल, की व्यक्तिगत आयुष्य संपन्न आणि सुखी करण्यासाठी कोणीतरी तयार केलेली एखादी योजना आपल्याला मिळावी आणि त्या योजनेप्रमाणं जाऊन आपण यशस्वी व्हावं, त्यांना मी म्हणेन, की हा मार्ग परावलंबनाचा आहे. ह्या मार्गानं हाती यश येत नाही. तुम्ही निरखून पाहा. तुम्हाला दिसेल की प्रत्येक यशस्वी जीवनामागं निश्चयांची व श्रमांची प्रेरणा असते. या गुणांना कुठल्याही साच्यात बसवता येत नाही आणि कोणत्याही कारखान्यात त्याचं उत्पादन होत नाही.

■ ■ ■

३. कर्मवीर आणि महाराष्ट्राची जडणघडण

– *गंगाधर पानतावणे*

परिचय : गंगाधर पानतावणे *(१९३७-२०१८)*

मराठीतील ज्येष्ठ लेखक, संशोधक, समीक्षक व आंबेडकरवादी विचारवंत. त्यांना अस्मितादर्श चळवळीचे जनक मानले जाते. साहित्य, समाजकार्य व शिक्षणक्षेत्रात त्यांनी मोलाचे कार्य केले. दलित साहित्याच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान बहुमूल्य आहे. 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे', 'मूल्यवेध', 'दलितांचे प्रबोधन', 'चैत्य', 'वादळाचे वंशज', 'प्रबोधनाच्या दिशा', 'हलगी', 'लोकरंग', 'साहित्य निर्मिती : चर्चा आणि चिकित्सा' आदी त्यांचे ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख', 'अस्मितादर्श', 'दलित-ग्रामीण मराठी शब्दकोश' या ग्रंथाचे संपादन पानतावणे यांनी केले आहे. पहिल्या मराठी विश्व साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.

प्रस्तुत पाठातून त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे विचार व कार्य आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी किती मोलाचे ठरले, याचा परामर्श घेतला आहे.

म. जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीतील स्फुल्लिंग घेऊन नव्या समाजनिर्मितीच्या वास्तवाला जे सामोरे गेले, त्यांत कर्मवीर भाऊराव पाटील यांचे स्थान फार मोठे आहे. सत्यशोधक चळवळ आता क्षीणप्राय होत आहे. सत्तेच्या कोंदणात मढवू पाहण्यासाठी लोक आपल्या निष्ठांचाही बळी देत आहेत, असे दृश्य ज्या वेळी महाराष्ट्रात दिसू लागले अगदी त्या वेळी आपल्या कार्याने महाराष्ट्राचे नवे शिल्प उभारण्यासाठी कर्मवीरांनी रात्रीचा दिवस केला. असाध्य ते साध्य करण्यासाठी सायास केले. महाराष्ट्रात राजकीय आंदोलने होती. परंतु, त्यांत स्वतःला गुंतवून न घेता सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक हीच क्षेत्रे त्यांनी आपली मानली. या क्षेत्रातील जडणघडण म्हणजे महाराष्ट्राची नवी उभारणी होती. फुले-आंबेडकरांप्रमाणेच ते क्रियाशील व कृतिप्रवण होते. म्हणूनच त्यांना महाराष्ट्रात नव्या समाजनिर्मितीचा प्रयोग करता आला. मग हा प्रयोग म्हणून उरला नाही, तर ते एक वास्तवच झाले.

म. फुले यांच्या रूपाने महाराष्ट्राला नवा आशय प्राप्त झाला होता. अवरुद्ध व तुंबलेल्या समाजाला क्रांतीच्या प्रदेशात नेऊन त्यांना परिवर्तनाचा नवा अर्थ देण्यासाठी फुल्यांनी संघर्ष केला. 'विद्येविण सर्वस्वाचा नाश होतो' असे जीवनसूत्र रुजविताना फुल्यांना प्राचीन अवस्थेतील औधत्य आणि एकांगीपण सलत होते. त्यातूनच वंचितांना

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Baryapur, Dist. Amravati

B.Com II (Sem 3)

कोणती ना जात ज्यांची कोणता ना धर्म ज्यांना
दु:ख भिजले दोन अश्रू माणसांचे माणसांना
प्रार्थना त्यांना म्हणू या ओंजळीने काय द्यावे.
धुंडती आकाश जेथे त्या धुळीच्या माणसांना.

■ ■ ■

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

३. जगणे कठीण झाले

– अशोक थोरात

***परिचय : अशोक थोरात** (जन्म : १९५४)*

मराठीतील एक अग्रगण्य कवी. बदलत्या काळातील सामाजिक जाणिवांबरोबरच या कवितेतून प्रेमविषयक भाव व्यक्त होतो. 'वादळातल्या प्रवासात' हा काव्यसंग्रह प्रकाशित. याशिवाय विविध दैनिक, साप्ताहिके व दिवाळी अंकातून त्यांची कविता प्रकाशित झालेली आहे. अनेक साहित्य संमेलनांमध्ये त्यांचा निमंत्रित कवी म्हणून सहभाग असतो. १९७६ पासून आकाशवाणी नागपूर व औरंगाबाद येथून कविता व मुलाखती प्रसारित. अविष्कार, शब्द, काव्यसंवर्धन पत्रिका, ग्रंथसंगत इ. अनियतकालिकांचे संस्थापक. विविध दैनिके, मासिके व दिवाळी अंकातून त्यांचे सातत्याने लेखन. महाराष्ट्र शासनाचा बहिणाबाई पुरस्कार, विदर्भ साहित्य संघाचा नवोदित साहित्य पुरस्कार इ. पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

प्रस्तुत कवितेतून आंतरिक प्रेमामुळे मनाची होणारी घुसमट अभिव्यक्त झालेली आहे.

आता मुक्यामुक्याने जगणे कठीण झाले
हृदयातले कधीचे आवाज क्षीण झाले

समजून फूल तुजला काट्यास प्रिय झालो
येऊ नये असे हे वाट्यास दिन आले

अजुनी मला कुठे तू नाकारले परंतु,
माझेच शब्द आता का अर्थहीन झाले

सांगू पुन्हा कशाला माझे जुनेच दु:ख
हुंदके तसेच अजुनी अश्रू नवीन आले

विसरूनी दु:ख सारे हसलो तसा कितीदा
खोटे मला परंतु रडता कधी न आले

कळले मला असे की जुळले तुझेही आता
माझेही ते इरादे स्वप्नी विलीन झाले.

■ ■ ■

B.Com II (Sem3)

त्यानुसार वागणं व विचार करणं म्हणजे नैतिकता. असा विचार व आचार करण्याची संवेदनशक्ती म्हणजेच नीती, नीतिशास्त्र आचार-विचारांचे संकेत म्हणा, नियम म्हणा, आदेश म्हणा हे सर्व निर्माण करते.

पूर्वी नीतिशास्त्राला धर्मकल्पनांचे अधिष्ठान होते. वाईट कृत्य केले किंवा चुकीचे कार्य केले, तर माणसाला पाप लागते, अशी सामान्यतः लोकांची श्रद्धा होती. सदाचार, सद्वर्तन यांचा संबंध धर्माने धार्मिक-आध्यात्मिक फलितांशी जोडला. नीतीचे हे धार्मिक अधिष्ठान मध्ययुगात किंवा मध्यमयुगापर्यंत फार प्रभावी होते, साफल्याचे धनी होते.

आधुनिक काळात धर्मप्रभाव ओसरला, त्या केवळ धर्माच्या धाकाखाली व धार्मिक श्रद्धेपोटी समाजातील आत्मवंचक व परवंचक नैतिकता टिकून राहिली. श्रेष्ठ-कनिष्ठतेची जाणीव, श्रेणीबद्धता, अस्पृश्यता, पुरुषवर्चस्व व स्त्रीदास्य यांसारख्या अमानुष सामाजिक-व्यक्तिगत वर्तनाने, खरेतर धर्माभिमुख नैतिकतेचे पालन केले असले, तरी अखेरपक्षी त्यांच्यामुळेच समाजाची नैतिक अधोगतीही झाली.

आधुनिकता, आधुनिकतावाद, इहवाद, व्यक्तिवाद यांसारख्या नव्या मूल्यांनी रूढी-नीतिमत्तेला हादरे देऊन ती खिळखिळी केली. नवी मानवकेंद्रित नीती व नीतिशास्त्र पुढे आले आणि या इहवादी नीतिशास्त्राला समाजाने यथाकाल मान्यता दिली.

परमतसहिष्णुतेचे श्रेष्ठ नीतिमूल्य असलेल्या आपल्या लोकशाही समाजात आपले संविधान व त्यातील तरतुदी यांनी आपल्या इहवादी नीतिशास्त्राला अधिष्ठान प्राप्त करून दिले. हे अधिष्ठान मध्ययुगीन धार्मिक अधिष्ठानाइतकेच महत्त्वाचे व प्रभावी होते. तथापि, इहवादी नीतिशास्त्रालाही मानवी इतिहासाच्या एका टप्प्यावर पराभवास सामोरे जावे लागले. तो टप्पा म्हणजे, विसावे शतक! दोन महायुद्धे, ज्यूंचे शिरकाण, अणुबॉम्बचे हल्ले, म. गांधींची हत्या, शीतयुद्ध, त्या शीतयुद्धात अमेरिकेचा झालेला विजय, जागतिकीकरणाची नवी लाट व त्या लाटेवर स्वार झालेले उदारीकरण, खाजगीकरण, यातून जन्मलेला मोकाट-अनिर्बंध व्यक्तिवाद आणि नव्या भांडवलशाहीचा प्रभाव, इत्यादींमुळे सत्ता व पैसा, सत्ता व हिंसाचार, सत्ता व भ्रष्टाचार यांची अमानुष समीकरणे जन्मास आली.

संविधान व त्यानुरूप सिद्ध झालेली कायदा-सुव्यवस्थेची तत्त्वे, न्यायालयांची कर्तव्ये यांच्या नैतिक प्रभावाला उत्तरोत्तर क्षीण करण्याचे, अप्रस्तुत ठरवण्याचे आणि त्यांचा धाक व दरारा नाकाम करण्याचे काम त्या समीकरणांनी केले. विज्ञान व तंत्रविद्या हे सध्याचे युगधर्म स्वभावतः मूल्यनिरपेक्ष असले, तरी त्यामागेही विवेकनिष्ठा

आहे आणि त्यांचे अस्तित्व नीतिमूल्ये मानणाऱ्या समाजातच असल्याने तेही नीतिनिरपेक्ष राहू शकत नाहीत. हे जर खरे असेल, तर सध्याच्या निष्प्रभ झालेल्या नैतिकतेचे व अप्रस्तुत बनलेल्या नीतिशास्त्राचे प्रश्न किती गुंतागुंतीचे आहेत, हे लक्षात येईल.

मला व्यक्तिशः या अंधारातून वाट सापडत नाही, एवढे खरे!

वरवर साधा वाटणारा पण जटिल असा यक्षप्रश्न म्हणजे- नैतिक प्रबोधनाचा, समाजातील नीतिमूल्यांच्या अभिसरणाचा कृती कार्यक्रम कोणता ?

या यक्षप्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे; कारण एकेकाळी धर्मसंस्था व धर्मगुरू, संत-महंत, आई-बाप व वडीलधारे कुटुंबीय, शाळा व शिक्षक, विचारप्रणाल्या, शासक व प्रशासक, कायदेमंडळे व न्यायसंस्था यांसारखे नीतिकारक व नीतिप्रसारक घटक समाजात होते. ते सर्व आता नाहीत. सगळे धर्म सोडून धंदा करू लागले.

सध्याच्या या नैतिकदृष्ट्या निराधार, अगतिक, लावारीस समाजाकडे बघता मला माटेमास्तरांच्या 'बन्सीधर, तू आता कुठे रे जाशील?' या चटका लावणाऱ्या करुण कथेची आठवण येते. बन्सीधर जत्रेत हरवतो, नंतर क्रमाने त्याला वडील व आई भेटतात; पण दोहोंनीही विवाहबाह्य संसार थाटलेला असतो. ही बन्सीधराची शोकात्मिका आहे. निराधार मुलगा व नैतिकदृष्ट्या निराधार समाज! म्हणून कळवळून प्रश्न विचारावासा वाटतो, समाजा- तू आता कुठे रे जाशील?

■ ■ ■

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Ta. Daryapur, Dist. Amravati

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

B.Com III (Sem 5)

३. माती

– शोभा रोकडे

परिचय : शोभा चंद्रभान रोकडे (जन्म : १९६३)

इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती येथे मराठी विषयाच्या सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत. स्त्री-पुरुष एकात्म जाणिवेच्या विपुल अभंगरचना करणाऱ्या नव्वदोत्तरी साहित्यातील महत्त्वाच्या कवयित्री. 'सांजभूल', 'संभ्रमसावल्या', 'तू निरंतर माझ्यातून', 'धुक्यात विरलेले आर्त', 'भेटी लागी जिवा', 'सूर्याची मशाल-बाप माझा' हे कवितासंग्रह; 'चित्रलिपी' तसेच कुष्ठरोग्यांवरील साहित्य चिकित्सेचे पाच समीक्षाग्रंथ, एकांकिका, चरित्रात्मक लेखन इत्यादी त्यांचे स्वतंत्र ग्रंथ प्रकाशित असून, 'बाई समजून घेताना', 'मराठी पत्रकारिता : बिंब-प्रतिबिंब' या ग्रंथांचे त्यांनी संपादन केले आहे. त्यांची 'तुझ्या भेटीसाठी' ही ध्वनिमुद्रिकासुद्धा निघाली आहे. त्रिपुरा राज्यातील अगरतला येथील राष्ट्रीय लेखक संमेलनात व केंद्रीय प्रसारण मंत्रालयातर्फे आकाशवाणीद्वारा इंदोर येथे आयोजित राष्ट्रीय बहुभाषिक संमेलनात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व त्यांनी केले आहे. त्यांच्या कवितासंग्रहांना महाराष्ट्रातील नामवंत पुरस्कार तसेच सामाजिक कार्यासाठी महाराष्ट्र शासनाचा 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' पुरस्कार प्राप्त असून त्यांना महिला चळवळींमधील कार्याची दखल घेऊन आजवर अनेक पुरस्कार व मानसन्मानाने गौरविण्यात आले आहे.

प्रस्तुत कवितेतून मातीचे माहात्म्य सांगतानाच माती आणि माता यांच्या जगण्याचे समांतर संदर्भ अधोरेखित केले आहे.

माती... कोंबाचं गर्भाशय
पाण्याचा शांत तळ
ग्रीष्मात भेगाळते
पावसाच्या धारा झेलते
बीजाचं दान स्वीकारते
अन् अंकुराला प्रसवते माती
माती गुलाल होते
माती चिखल होते
माती जपून ठेवते
पाऊलखुणा...

वारा येईपर्यंत
माती कधीच नाही उडत
उडते फक्त बंडखोर धूळ
माती पराक्रमाचा
गौरवटिळा होते... पळपुट्यांच्या पाठीशी लागते
माती होते भाद्रपदात गणपती
आश्विनात शारदा, दुर्गा, उंदीर
अन् राक्षसही
विसर्जनात ती सोडून देते
अंगी आलेलं देवपण
नि तळाशी जाऊन बसते
धीरगंभीर डोहाच्या
दिवाळीच्या दिव्यासाठी
स्वत:ला भाजून घेते माती
माती काठ होऊन नदीला सावरते
अन् माठ होऊन तृष्णेलाही
माती... पोट फाडून जीवन देते माणसाला
अन् जीव गेला की
पोटातही घेते माणसाला
मातीच सांभाळते...
दगडाचे कठोरपण
पाण्याचे ममत्व
भूकंपाचे, वादळाचे पिसाळलेपण
मातीच घेते पदरात सगळ्यांना...
सगळ्यांची माय होऊन...

■ ■ ■

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

व्यापलेला आहे. या पृष्ठभागाचे चार प्रदेश असे, अंश, गज, सिम-वाळवंटी आणि गवताळरानी प्रदेश आहेत.

वीसेक किंवा पन्नास हजार वर्षांपूर्वी मानवसमूह तेव्हा उदरनिर्वाहासाठी योग्य वसतिस्थाने शोधत भटकत होते. आपल्या प्रजातीचे वंशसातत्य टिकवण्यासाठी किंवहुना आत्मसंरक्षणाखातर, छोट्या समूहांनी अन्य छोट्या समूहांशी मिलन करण्याचा निर्णय घेतला. वंशसंकर आणि समूहसंकरातून आदिमसमाज निर्माण झाले. त्यांची प्रजा वाढली, त्यांची सामूहिक शक्ती वाढली. त्यांचे कौशल्य वाढले. त्यांच्यातली विविधता वाढता-वाढता आदिसंस्कृती उदयाला आल्या. एकाच क्षेत्रात वसती करून त्यांनी आदिसत्ताव्यवस्थेचा पाया रचला. प्रदेशनिष्ठ संस्कृतींचे मूळ अशाप्रकारे आपल्या वसतिस्थानावरला आपला सामूहिक हक्क पुकारण्यात आहे. समूहाच्या स्वायत्ततेच्या सरहद्दी इतर समूहांना जाणवून देण्यासाठी आहेत. आधुनिक 'राष्ट्रवादा'च्या बुडाशी ही मालकी हक्क पुकारण्याची आदिम रीत आहे. खाजगी घरावर, मालमत्तेवर, पतिपत्नीवर, मुलाबाळांवर अधिकार गाजवताना किंवा हक्क सांगताना आपण कळतनकळत या आदिम परंपरेला अनुसरत असू.

वसतिस्थानाच्या जमिनीवर आणि पाण्याच्या पुरवठ्यावर तेथील मानवसमूह हक्क सांगतो खरा; पण कोणत्याही समूहात पाण्यावरला समान हक्क किंवा पाण्याच्या समान वाट्यावरला हक्क मान्य केला जात नाही. त्या बाबतीत कमालीची विषमता आणि राजरोस अन्यायच दिसून येतो.

माणसे, पशुपक्षी आणि वनस्पती एकाच प्रदेशात राहताना त्या प्रदेशातले उपलब्ध पाणी पितात. या पाण्याचे वाटप शहाणपणाने करायचे, तर प्रत्येकाची मूलभूत गरज आणि वाट्याला येणाऱ्या पाण्याचे प्रमाण यांचा मेळ घालावा लागेल. औद्योगिक समाजात खाणी आणि कारखानेसुद्धा पाणी 'पितात'. शिवाय माणसे, खाणी, कारखाने, यंत्रे ही सगळी मिळून या सार्वजनिक किंबहुना पर्यावरण व्यवस्थेला सामाईक अशा उपलब्ध पाण्याला गढूळ आणि प्रदूषित करून त्याला निरुपयोगी बनवतात, त्याचे काय?

नद्या, खाड्या आणि समुद्र प्रदूषित होतात तेव्हा जलनिष्ठ प्रजाती नष्ट होऊ लागतात. मासे मरतात आणि मासेमारी करणारे कोळी आपले निर्वाहाचे साधन गमावतात. प्रदूषित मत्स्याहारामुळे जलसंपत्तीवर आजही व्यापारी चाचेगिरी चालते. कारण आपापल्या सागरी सरहद्दीपलीकडचे महासागर सर्व राष्ट्रांना खुलेच आहेत.

कोणत्या प्रदेशात कोणते पीक घ्यावे, हा प्रश्न जागतिकीकरणामुळे आता निरनिराळा आलेला आहे. कुटुंबात वाटेकरी वाढले की, चुलत-चुलत भावांना जमिनीचा आणि पाण्याचा वाटा कमी-कमी होत जातो. संयुक्त कुटुंबे विभक्त होत जातात. हा नियम खेड्गावापासून गाव्यापर्यंत, गाव्यापासून राष्ट्रापर्यंत आणि राष्ट्रापासून जगापर्यंत लागू होतो. लोकसंख्येच्या स्थलांतरांचा इतिहास पाहिला तर असे दिसेल की, मानवी वंश आणि समूह सातत्याने स्थलांतर करत आहेत. मागणारांची गर्दी कुठल्याही व्यवस्थेला प्रमाणाबाहेर झेपत नाही. गर्दी जमण्याचे आणि विखुरण्याचे नियम, जे एलियास कानेट्टी या महान विचारवंताने दाखवून दिले, हेच पाण्याच्या व्यवस्थापनाला लागू पडतात. पाण्याची तहान कोणत्याही समाजाला, संस्कृतीला, राष्ट्रसत्तेला उद्ध्वस्त करू शकते.

तहानेचाच महापूर झाला, तर मानवी व्यवस्थांमध्ये प्रलय होऊन जाईल! आज आपण जी पिके घेतो, ती त्या-त्या प्रदेशातली मूळची पिके नाहीत. 'पीक' मानवनिर्मित आहे, कारण 'शेती'च मुळी मानवनिर्मित आहे. माणसांप्रमाणेच मासे, प्राणी आणि वनस्पती यांची इतिहासात सतत स्थलांतरे झालेली आहेत आणि ही स्थलांतरे जागतिकीकरणाच्या अविरत प्रक्रियेचे टप्पे आहेत.

उपलब्ध पाण्याचे मूल्य ध्यानात न घेता शेती करणे अवैधानिक आणि घातक ठरेल. रोपे, बीजे किंवा जैव ऊती आयात करून आपण आपापल्या प्रदेशातली शेती जागतिक आर्थिक स्पर्धेत यशस्वी करू शकतो. मात्र, हे करताना पाण्याच्या स्रोतांच्या पुनरुज्जीवनाचाही आपल्याला दीर्घकालीन विचार करावा लागेल. नियोजनाची लक्ष्ये आणि दिशा बदलाव्या लागतील. पाणी हे प्रादेशिक भांडवल आहे, हे सर्वांच्या मनावर पक्के बिंबवावे लागेल. उद्योगधंदे आणि सधन शेतकरी किंवा प्राधिकरणे आणि बहुराष्ट्रीय महाकंपन्या यांच्या पाण्याच्या वापरावर सार्वजनिक अंकुश ठेवावा लागेल.

सध्याच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात मूठभर महासत्तांच्या आणि राष्ट्रसत्तांच्या मूठभर महाकंपन्यांच्या आणि बाजारपेठांच्या ताब्यात जमीन, पाणी आणि हवा आहे. संयुक्त राष्ट्रसंघासारखे जागतिक राष्ट्रमंडळसुद्धा या मूठभरांची मिरास मर्यादित करू शकत नाही. आपल्या राजकीय पक्षांनासुद्धा पाण्यासारख्या बाळबोध आणि मूलभूत गरजेला आपल्या कार्यक्रमात अग्रस्थान देण्याची अक्कल नाही.

यामुळे आपल्या तोंडचे पाणी पळाले नाही, तर नवलच!

■ ■ ■

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

B.Com III (Sem 6)

घरटे उडते वादळात
बिळा-वारुळात पाणी शिरते
कोणती मुंगी कोणतं पाखरू
म्हणून आत्महत्या करते

प्रतिकूल परिस्थितीतही वाघ
लाचारीने जगत नाही
शिकार मिळाली नाही म्हणून
कधीच अनुदान मागत नाही

घरकुलासाठी मुंगी
करत नाही अर्ज
स्वतःच उभारते वारूळ
कोण देतो गृहकर्ज

राब राब राबून बैल
कमावून धन देतात
सांगा बरं कुणाकडून
ते निवृत्तिवेतन घेतात

कास्तकाराची जात आपली
आपणही हे शिकलं पाहिजे
पिंपळाच्या रोपासारखं
पाषाणावर टिकलं पाहिजे

घाबरू नको कर्जाला
भय व चिंता फासावर टांग
जीव एवढा स्वस्त नाही
सावकाराला ठणकावून सांग

काळ्या आईचा लेक कधी
संकटापुढे झुकला का
कितीही तापला सूर्य तरी
समुद्र कधी सुकला का

निर्धाराच्या वाटेवर
टाक निर्भीडपणे पाय
तू फक्त विश्वास ठेव
पुन्हा सुगी देईल धरणी माय

निर्धाराने जिंकू आपण
पुन्हा यशाचा गड
आयुष्याची लढाई
फक्त हिमतीने लढ

■ ■ ■

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

B.Com III (Sem 6)

डॉक्टर किंवा समाजातली जबाबदारी मंडळी या गोष्टींचा फारसा विचार करताना दिसत नाही. धार्मिक संस्थानवर गेल्यावर हातावर असे गंडे, धागेदोरे बांधले जातात, वाईट नजर, संकट किंवा अरिष्ट टळावे, हाच यांचा मुख्य उद्देश असतो. अनेक तीर्थस्थानावरून परतणाऱ्या भाविकांचे रस्त्यात अपघात होतात, त्यात मृत्युमुखी पडणाऱ्या असंख्य भाविकांच्या हातावर असे गंडे, धागे-दोरे असतात, हे नेमके आपल्या निरीक्षणातून सुटते. कोणताही गंडा, धागा-दोरा तुमच्या आयुष्याचे संकटापासून रक्षण करू शकत नाही, हे सत्य असताना आपण निव्वळ एखाद्या काल्पनिक गोष्टींच्या मागे सतत धावत असतो. अनेकदा अंधानुकरण करीत असतो, हे लक्षात घ्यायला हवे.

धागेदोरे मंत्रून देण्याचा ग्रामीण भागात मोठा प्रघात आहे, मात्र त्या केवळ आपल्या समजुती आहेत, यापलीकडे त्यांना काहीही अस्तित्व नाही, हे ठासून सांगण्याची हिंमत कुणी करीत नाही. विविध ठिकाणी मिळणारे विविध प्रकारचे ताईत यांच्यातही कोणत्याही प्रकारची शक्ती नसते, हे आपण कधीतरी लक्षात घेतले पाहिजे. मनाचे सूचना घेण्याचे सामर्थ्य प्रचंड असते. एखादी सूचना आपल्या मनाने स्वीकारली की त्या पद्धतीने आपण वागायला लागतो, त्यात पुढे चांगले परिणाम आले तर त्याचे श्रेय अशा कर्मकांडांना दिले जाते, प्रत्यक्षात हे सगळे सामर्थ्य प्रत्येकाच्या मनाचे असते. संकटांपासून संरक्षण करण्याची ताकद जगातल्या कोणत्याही गंडे, धागे-दोरे किंवा ताईत यांच्यात असू शकत नाही. यात थोडेसे जरी तथ्य आढळले असते, तर त्याचा उत्तम उपयोग आपल्या संरक्षणयंत्रणेला करून घेता आला असता. त्यांनी भारतीय सैन्यात अशा ताईत, धाग्यांसाठी स्वतंत्र विभाग उभारला असता. शस्त्रे, दारूगोळा, कठोर प्रशिक्षण, सराव, कोट्यवधी रुपयांचे बजेट यांची भानगड एकदाची संपली असती. असे झाले असते तर जगाच्या पाठीवर भारतीय लष्कर सर्वात मजबूत आणि सुरक्षित समजले गेले असते, परंतु वस्तुस्थिती नेमकी काय आहे याकडे आपण आणखी किती काळ कानाडोळा करणार आहोत, याचा विचार करायला हवा.

गंडे, धागे-दोरे, ताईत यांच्यामागे आपण स्वीकारलेली प्रभावी सूचना काम करीत असते, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सूचना अतिशय मोलाचे काम करीत असतात. आपण आतून स्वतःला जसे समजतो तसेच घडत जातो, हे आजचे मानसशास्त्र सांगते. अशा प्रकारची तत्सम उपाययोजना आपले मनोबल काहीकाळ वाढविण्यात मदत करीत असल्या तरी कायम तसे मानणे हा आत्मघात होय, याचा आपल्याला विसर पडतो, हे अधिक घातक समजले पाहिजे. ज्या पेशव्यांचे सामर्थ्य प्रचंड होते, त्यांचा घात अशाच प्रकारच्या कर्मकांडांनी केला, हा इतिहास आपण विसरत असू तर आपल्या मदतीला आकाशातील कुणी बाप येणार आहे हे दिवास्वप्न आहे, हे

बघण्याचे दिवस केव्हाच संपले आहेत, हे आपल्या मेंदूवर कायम कोरण्याची गरज निर्माण झाली आहे.

खरोखरच गंडे, धागे-दोरे, ताईत आपले रक्षण करण्यात सक्षम असते, तर आपले प्रगत आरोग्य विज्ञान, कोट्यवधी रुपयांच्या मशिनरी किंवा नवनव्या टेस्ट, औषधे, शस्त्रक्रिया यांची गरजच पडली नसती. युरोपात यावर मोठ्या प्रमाणावर संशोधन झाले आहे, त्यालाही आता दोनशे वर्षांचा काळ लोटला आहे. चावून चोथा झालेल्या विषयांना आपण आणखी किती दिवस कवटाळत बसणार आहोत, याचा विचार एकदा करण्याची गरज आहे. एकविसाव्या शतकात देहाने जगणारी माणसं मनाने पुराणकाळात जगत असतील तर गंडे, धागे-दोरे, ताईत ज्यांच्या अर्थप्राप्तीची प्रतीके आहेत, त्यांच्या हातात आपले जीवन देण्यात कोणता शहाणपणा आहे? याचा विचार आपल्याला करावा लागेल. माणूस विज्ञानाचे आविष्कार वापरायला लागला, परंतु त्याच्या पारंपरिक मेंदू-संस्कारातून वैज्ञानिकदृष्टी हद्दपार झाल्याचे दिसते, हे आपल्या सामूहिक बौद्धिक दारिद्र्याचे लक्षण म्हटले पाहिजे. असले बौद्धिक मागासलेपण घेऊन आम्हाला महासत्ता व्हायचे असेल तर या जन्मात ते पूर्ण होणार नाही, हेही समजून घ्यायला हवे. गंडे, धागे-दोरे, ताईत हे वरकरणी निरुपद्रवी दिसणारी कर्मकांडे असली, तरी त्यातून माणसाची कर्तृत्वशक्ती संपण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसायला लागतात. कोणतीतरी शक्ती आपले रक्षण करते हे एकदा मान्य केले की, स्वतः काहीतरी प्रयत्न करावे लागतात याचा आपल्याला विसर पडतो, हीच आपल्या अधोगतीची सुरुवात असते...

■ ■ ■

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

B.A.ICsem I)
MLT

डाबरीतून पाणी काढून आणते. पैशाची त धारच लागली त्याच्या हाती. गावातली सम्दी पगारदार नोकरशाही घेतली त्यानं ....'

'त्याले कारण राघोजी शेवाळेचे गबदुल्ले बैल हैत भौ ! लदलद मासाचे. धक्का सन करत नाईत ....'

'नाईतं त्या पिराच्या उरफोड्या चढावून देवराव बापूचा ट्रॅक्टर चढून येत नाई लवकर. कापरं भरते त्याले. चढताना डरॉव डरॉव करते; तहानल्या बेंडकीवाणी. तिथून त्याचे बैल पाणी वढून आणतात ....'

'म्याबी एकदा त्योच इचार केला .... म्हणलं आपूनबी पाणी इकायचा धंदा करू .... पण नाई रेटलं मपल्या बैलाले. पिराचा चाराणे चढ चढला आसंल नसंल .... पटकन एक बैल मुटके मारताना खाली बसला. अन् दुसरा बेल्डी तुटून पायाच्या फऱ्यातून उखळला... मंग तिथंच टाकी खाली करावं लागली. अन् लंगडा बैल घेऊन बोंबलत यावं लागलं. त्यो बैल आजूनबी सुदरून नाई राह्यला.' सांगताना किशोर माळोदे उदास झाला.

'आता माह्याबी बैलाची तशीच गत व्हती कानू बाप्पा एखांद्या दिवशी .... ' असं म्हणताना राघोजी शेवाळे मनातल्या मनात खोल खोल कोरडी विहीर झाला.

'त्या एकडांग्याच्या पाझर तलावावर गढूळ पाणी तुंबेल हाये. ते तरी एक बरं हाये. वरपाय कामी येते ढोरायले .... '

'पण ते तरी आजूक किती दिवस पुरणार हाये ? ते आटल्यावर मंग कसंच व्हावं ? गारमाळात हौद हाये. पण तिथी बैलं पाणी पाजायले न्यावं त वावरातले कामं कधी करावं .... दोन कोसावर बैलं नेण्या आणण्यातच दिवस सरून जायाचा ....'

'मंग वावरातले कामं करायचेच नाई आता ....'

'अन् वावरं पडीत पाडायचे .... फाशा घेऊन मरायचं ....'

'ते जावू द्या .... आणीक पुढं या सरकारी कर्मचाऱ्यायचा परताप आयका .... पेपर पुढो म्हन्ते, सध्या या गावातली पाणी पुरवठ्याची तातडीची कामे हाती घ्यायची आवश्यकता असताना, पदाधिकारी यांच्या सुस्त कारभारामुळे या कामांना अद्याप सुरुवात झालेली नाई. गेलेला प्रस्ताव त्रुटी अभावी दोन दोन वेळा परत येतो ....'

'घ्या आता .... सरकार देते. पण हे अधिकारी योजना लोकायजवळ आणून देत नाई. मंधातल्या मंधातच आसा घोळ घालून ठेवतात. आता आपलं एवढं मोठं पंधरा हजार लोकवस्तीचं गाव. पण हाये काई ताळामेळ ? एवढ्या मोठ्या गावात दोन्नच हापशा कामाच्या .... त्याह्यचाबी दंडा मारून मारून छातीचा फुगा फुटायची पाळी येते. हात गळून येतात. अन् हांडक्या मडक्यात धार कशी पडते, ती पहावं, त तिच्यापेक्षा दोन वर्षाचं लेकरू जोऱ्यानं मुतते ....'

'त्या भुईतलं पाणी तरी किती दिवस पुरणार हाये ? समद्या नसा आखडून घेतल्या

भुईच्या, जागजागी हापशा अन् इहिरी झाल्या. आता समजा, एखांद्या माणसाच्या आंगातून सम्द रगत काढून घेतलं. त त्याच्या आंगात कुठून रगत येणार .... त्यो माणूस तसाच वाळून खंगर होणार. तसे ह्या भुईच्या पोटातून वाह्यणारे पाण्याचे नळ. म्हन्जे तिच्या नसा. त्या माणसानं जागजागी कापून घेतल्या. पाणी वर वरपून घेतलं. त पाणी तरी कुठून येणार हाये भुईच्या पोटात ? का चुकलं ?' असं सगळ्यांकडे पाहत, आपल्या मांडीवर थोपटत, नंदू आळशी म्हणाला.

हा पाईंड बरोबर हाये साला. ज्यो पहावं त्यो वलिती करायची म्हन्ते .... इहिरी खंदते. मोटारी बसवते. गहू, हरबऱ्याच्या घाती हिवाळा सरायच्या आतच जमिनीच्या पोटातलं सम्दं पाणी वरपून घेतल्या जाते.' तात्याला मुद्दा पटला होता.

'काय आमच्या जमान्यात बरसाती व्हायच्या, पंधरा पंधरा दिवस वळाण्या व्हत नव्हत्या. त्याच्यानं औतंफाटे बंद रहायचे पंधरा दिवस ....'

'आमच्या लहाणपणी आम्ही ओंजुळीनं पाणी प्यायचो. वसंतराव पाटलाच्या शेवडीवाल्या पट्टीत. अन् आता त्याच शेवडीवाल्या पट्टीत जिभीनं चाटायले पाणी सापडत नाई ....'

'पण याचं कारण काय असावं ?' शिवराम मामाने विचारलं. तसा नंदू आळशी ओरडला.

'पातळी ऽऽ पाण्याची पातळी खोल गेली .... दुसरं काय ? बोलू बोलू नल्डा कोल्डा पल्डा इच्यामिनी .... पाणी बलवा हो होगेबुवा तांब्याभर ....'

असं नंदू आळशी कपाळावरचा घाम पुसत म्हणाला. तर त्याचं बोलणं ऐकून होगे आगीचा चटका दिल्यासारखा दचकला.

'ते नाई जमनार हो भटजीबुवा .... वाटलं त जेवून जा आमच्या घरून. पण पाणी नका मांगु गिलासभरबी .... पाणीच नाई घरात. आमीच त तहान लागली की एका एका घोटात नल्डा अन् होठ वल्ले करून आल्यावाणी करतो .... पारगं पारगं नंबर लावून बस्ती आमची सून गोंधणीजवळच्या हापशीवर. त्याच्यानं ती राखणंच आसती पाण्यावर. तुमाले काय सांगावं, आंघोळीचं सोडा .... वल्या फडक्यानं आंग पुसायलेबी पाणी नाई म्हणती ती .... '

असं होगे आपल्या घरचं, पाण्याचं सांगतच होता, तर त्याच्या वाड्यात एकदम कल्लोळ उठला. भगवान होगेची बायको तिच्या बारक्या पोराला बुकलत होती. मारता मारताच कर्कश आवाजात बोलत होती. आणि तिच्या हातातलं बारकं पोरगं मानेवर सुरी ठेवून कापणं सुरू असावं, तसं कर्कश ओरडत होतं. हिसडा-हिसडी करून ते मायच्या हातातून सुटलं. अन् दुकानापुढे धापाळत आलं. मरणाचं भेदरलं होतं. त्याच्या मागे

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati
Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

B. A-II (Sem I)

(अ) माझ्या मना बन दगड

हा रस्ता अटळ आहे!
अन्नाशिवाय, कपड्याशिवाय,
ज्ञानाशिवाय, मानाशिवाय.
कुडकुडणारे हे जीव
पाहूं नको! डोळे शीव!
नको पाहूं जिणें भकास;
ऐन रात्रीं होतील भास;
छातीमध्यें अडेल श्वास.
विसर यांना, दाब कढ;
माझ्या मना बन दगड

हा रस्ता अटळ आहे!
ऐकूं नको हा आक्रोश,
तुझ्या गळ्याला पडेल शोष.
कानांवरती हात धर,
त्यांतूनही येतील स्वर.
म्हणून म्हणतों ओत शिसें;
संभाळ, संभाळ, लागेल पिसें!
रडणाऱ्या, रडशील किती?
झुरणाऱ्या- झुरशील किती?
पिचणाऱ्या, पिचशील किती?
ऐकूं नको असला टाहो
माझ्या मना दगड हो!

हा रस्ता अटळ आहे!
येथेंच असतात निशाचर
जागोजाग रस्त्यावर.
असतात नाचत काळोखांत;

हंसतात विचकुन काळे दांत;
आणि म्हणतात, "कर हिंमत;
आत्मा वीक, उचल किंमत!
माणूस मिथ्या, सोनें सत्य;
स्मरा त्याला, स्मरा नित्य."
भिशील ऐकून असले वेद;
बन दगड, नको खेद!

बन दगड आजपासून;
काय अडेल तुझ्यावांचून;
गालावरचें खारें पाणी
पिऊन काय जगेल कोणी?
काय तुझे हे नि:श्वास
मरणाऱ्यांना देतील श्वास?
आणि दु:ख छातीफोडें
देईल त्यांना सूख थोडें?
आहे दु:ख तेंच फार;
माझ्या मना कर विचार;
कर विचार : हस रगड;
माझ्या मना बन दगड!

हा रस्ता अटळ आहे!
अटळ आहे घाण सारी;
अटळ आहे ही शिसारी.
एक वेळ अशी येईल
घाणीचेंच खत होईल?
अन्यायाचीं सारीं शितें
उठतिल पुन्हां, होतील भुतें.

या सोन्याचे बनतील सूळ!
सुळीं जाईल सारें कूळ.

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

आई : तिला मी अशा ठिकाणी पाठवलंय जिथे तिला कसलाही त्रास होणार नाही.
नेत्रा : पण कुठे?
आई : वसईला – गंगूताई वृद्ध महिलाश्रमात!
मंदार : काय!!!
वीणा : काय!!!!
आई : तुम्हाला एवढं दचकायला काय झालं? त्या आश्रमाच्या व्यवस्थापनात माझ्या ओळखीचे काही लोक आहेत. तिची उत्तम सोय होईल तिथे. मी चिठी दिलीय तिला.
मंदार : पण तो आश्रम तर—
आई : काय झालं त्या आश्रमाला?
मंदार : ती जागा विकली त्या मालकाने—
आई : विकली नाही. विकणार आहे. पण त्याला तशी ती विकता येणार नाही... कुणाला तशी विकत घेता येणार नाही. 'आम्ही त्यांच्या घरासमोर आंदोलन करू' असं त्या संस्थेच्या एका कार्यकर्त्याने आजच मला सांगितलं.
मंदार : (वीणाला) बघितलंस... झाला ना घोटाळा?
आई : कसला घोटाळा?... काय बोलतोयस मंदार तू?
मंदार : आई ती जागा... मी विकत घेतलीय...
आई : तू?
मंदार : हो. आजच ॲग्रीमेंट झालं!
आई : (सुन्न) काय सांगतोयस काय तू हे! मंदार... मला न विचारता... काय उद्देश काय होता तुझा?
मंदार : आम्हाला त्या जागेवर बंगला बांधायचाय!
आई : (गोंधळून) बंगला बांधायचाय? त्या आश्रमाच्या जागेवर? कधी ठरवलंत हे? मला का नाही विचारलंत?
वीणा : तुम्हाला काय विचारायचं?
आई : वीणा! कुणाशी बोलतेयस तू? माझ्या परवानगीशिवाय कुठलीही गोष्ट केलेली मला खपत नाही, हे तुला चांगलं ठाऊक आहे! मंदार, तू काय चालवलंयस हे? माझ्या आज्ञेबाहेर ह्यापूर्वी कधी गेला नव्हतास तू!
मंदार : अग, तुला सांगणारच होतो.
आई : कधी? ॲग्रीमेंट झाल्यानंतर?
मंदार : सॉरी!
आई : सॉरी काय! फाडून टाक ते ॲग्रीमेंट आत्ताच्या आत्ता.

[तो बॅग उचकतो.]
वीणा : थांबा हो! खबरदार ते ॲग्रीमेंट फाडलंत तर!
आई : मंदार, काय सांगितलं मी तुला? फाड ते ॲग्रीमेंट! तो आश्रम माझ्या देखरेखीखाली बांधला गेला होता! एके काळी मी माझं रक्त आटवलंय तो आश्रम स्थापन करण्यासाठी! आता त्याचं जर काही बरंवाईट होणारच असेल तर ते माझ्या मुलाकडून मी कदापिही होऊ देणार नाही. फाड ते ॲग्रीमेंट! आपल्याला नकोय ती जागा!
वीणा : पण मला हवीय.
आई : वीणा! (थरथर कापू लागते)
पपा : पण मला कळत नाही, तुला एवढं चिडायला काय झालं? घेतली त्यांनी ती जागा विकत म्हणून काय आकाश कोसळणार आहे? मी पाहिलाय तो आश्रम. आश्रम कसला, एक चारखणी जुनाट झोपडं आहे झालं! तिथल्या म्हाताऱ्यांच्या हातात काठ्या नसतील इतके खांब लागलेयत त्या झोपडीला. मंदार, तू केलंस ते योग्यच केलंस. गो अहेड! ते खोपटं पाडून एक झकास मॉडर्न डिझाइनचा बंगला बांधून टाक. उद्घाटन मात्र मी करणार – माझ्या रिटायर्ड मित्रांबरोबर...
[मंदारचं त्यांच्या बोलण्याकडे लक्ष नाहीय. आईच्या डोळ्यांत त्याला आश्चर्य, भीती, राग इत्यादी सगळ्या भावना दाटून आलेल्या दिसतात.]
मंदार : (शरमेने) आई, प्लीज मला समजून घे.. अग, मी हे...
आई : मंदार... तू... तूसुद्धा इतरांच्या वळणावर गेलास? तूसुद्धा लबाड निघालास?
नेत्रा : म्हणजे लबाडी काही फक्त आम्ही नाही केलेली!
वीणा : ह्यात कसली आलीय लबाडी? बंगला काही आम्ही स्वत:करताच बांधणार नाही आहोत! सगळ्यांसाठीच असेल तो. स्वत:करता घेतात तो दोन रुमचा फ्लॅट... बँकेच्या हौसिंग सोसायटीत.
नंदन : वहिनी, प्लीज...
वीणा : प्लीज, वगैरे तिला – तुमच्या बायकोला म्हणा, भाऊजी. तिनेच मला आधी डिवचलं. बरं का आई, आम्ही वसईला जागा घेणार आहोत म्हणून तुम्हाला एवढा राग आला. पण तुमच्या धाकट्या सुनेने पार्ल्याच्या एका हौसिंग सोसायटीत पैसे भरलेयत हे कुठे तुम्हाला ठाऊक आहे?
आई : (आणि एक धक्का) नंदन, हे खरं आहे?
[तो गप्प. तिला घेरी आल्यासारखी होते.]
मंदार : आई...
आई : हात लावू नकोस मला... तुम्ही दोघंही... मी... एवढं तुमच्यासाठी करून...

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

B.A.I(sem I)

(क) मोडलेल्या माणसांचे दुःख ओले झेलताना

मोडलेल्या माणसांचे दुःख ओले झेलताना
त्या अनाथांच्या उशाला दीप लावू झोपतांना.

वाहताना भार त्यांचा जाहले गणगोत त्यांचे
कोणते नाते कळेना बांधले आयुष्यभरचे
दुःख भिजले वेचतांना झोपले काट्यांवरी जे
आपुल्या साऱ्या सुखांचा जाळ पोटी जाळतांना.

माणसांची श्वापदे लावून बसलेली कवाडे
हे पवाडे गात फिरले झोपड्यांच्या गल्बतांना
जातिधर्माची महत्ता बंद जेथे राजरस्ता
फाटक्या बाहीवरी जे झुंजले सूर्यास्त असता.

कोणती ना जात ज्यांची कोणता ना धर्म ज्यांना
दुःख भिजले दोन अश्रू माणसांचे माणसांना
प्रार्थना त्यांना म्हणू ह्या ओंजळीने काय द्यावे.
धुंडती आकाश जेथे त्या धुळीच्या माणसांना.

■ ■ ■

१२.
विठ्ठल वाघ

■

परिचय : विठ्ठल वाघ (जन्म : १९४५)

विठ्ठल भिकाजी वाघ हे वऱ्हाडी कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचे 'कपाशीची चंद्रफुले', 'काया मातीत मातीत', 'गावशीव', 'पंढरीच्या वाटेवर', 'पाऊसपाणी', 'साय', 'वृषभ सूक्त' इत्यादी कवितासंग्रह व 'डेबू' ही गाडगे बाबांच्या जीवनावर आधारित कादंबरी प्रकाशित आहे. त्यांच्या 'काया मातीत मातीत' या संग्रहाला प्रियदर्शिनी पारितोषिक तसेच 'पाऊसपाणी' या संग्रहाला केशवसुत पुरस्कार मिळाला आहे. त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा व गीतलेखन केले आहे. या कार्यासाठीही त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

औंध साहित्य संमेलन, महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन, कामगार साहित्य संमेलन, बोली साहित्य संमेलन, विदर्भ साहित्य संमेलन, कृषी साहित्य संमेलन अशा अनेक साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे.

कवी विठ्ठल वाघ यांनी अमरावती, अकोला, बुलडाणा, जळगाव व औरंगाबाद या पाच जिल्ह्यातून पायी हिंडून काव्ययात्रेतून समाजप्रबोधन केले आहे. अमेरिका, कॅनडा या देशांमध्ये विठ्ठल वाघ यांच्या काव्यगायनाचे कार्यक्रम संपन्न झाले आहेत. यावरून त्यांनी मराठी कविता साता समुद्रापार पोहचवली हे लक्षात येते.

महाराष्ट्र शासनाच्या साहित्य आणि संस्कृती मंडळाने बोलीभाषेतील शब्दांचा संग्रह वाढविण्यासाठी पुढाकार घेतल्यानंतर प्रत्येक विद्यापीठाच्या आसपासच्या जिल्ह्यातील बोलीभाषेतील शब्दांचा संग्रह करण्याचे काम सुरू केले. त्यासाठी विद्यापीठाने डॉ. विठ्ठल वाघ यांची नेमणूक केली होती. वाघ यांनी ३३ तालुक्यांचा दौरा करून काही म्हणी व शब्द संकलित करून समर्थपणे ही जबाबदारी पार पाडली. विठ्ठल वाघ यांच्या कवितेतून ग्रामजीवनाचे विविध विषय चित्रित झाले आहेत.

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

B-A-II (Sem IV) ०

आतून काही शूर लोक गेले आणि त्यांनी या कपटमार्गाने ट्रॉयमध्ये प्रवेश मिळवला आणि ट्रॉय पडलं.''

''म्हणजे कपटमार्गाने शत्रूच्या गोटात निर्धास्त प्रवेश मिळविण्याच्या साधनाला 'ट्रोजन हॉर्स' म्हणतात ना?'' टॉमने विचारले. त्याचे तात्पुरते तरी समाधान झालेले दिसले. ''पण सगळी गोष्ट सांगितली पाहिजे बरं का.''

''जरूर! उद्याच सांगेन.'' डॉ. फ्लेमिंग यांचे मन अकारण उद्विग्न झाले होते आणि निराळ्याच मार्गाने धावू लागले होते. ते भरभर ऑफिसकडे गेले.

USF च्या मुख्य 'कॉन्फरन्स रूम'मध्ये प्रतिनिधींची सभा भरली होती. अध्यक्ष बोलत होते, इतक्यात डॉ. फ्लेमिंग तरातरा आत शिरले.

''या डॉ. फ्लेमिंग. अभिनंदन! तुमच्या तोडग्यामुळे आपल्याला पायोनियर-१० परत मिळालं. नाहीतर आपण बिचाऱ्याला बाहेरच जाळून टाकलं असतं,'' अध्यक्ष उद्गारले. ''आता आम्ही त्याला सन्मानाने परत पृथ्वीवर आणणार आहोत.''

''थांबा. तुम्ही माझं ऐकलंत त्याबद्दल आभारी आहे; पण आणखी थोडं ऐकाल तर जास्त आभारी होईल.हे यान पृथ्वीवर आणण्यापूर्वी त्यांची संपूर्ण चाचणी घेणं आवश्यक आहे. ज्यांनी हे पाठवलं ते आपले मित्र असतीलच असं नाही.'' – डॉ. फ्लेमिंग.

''पण तुम्ही स्वत: आणि तुमच्या सहकाऱ्यांनी यांत्रिक उपाय वापरून गुप्तांनी पाठवलेल्या सर्व फोटोंची चाचणी घेतली. त्यात काहीही वेगळं आढळलं नाही,'' अध्यक्ष म्हणाले. ''तरीपण तुम्हांला आणखी फोटो पाहिजे असल्यास सांगा. गुप्ता अजून यानाभोवती घिरट्या घालतोय.''

''नाही, वेगळी चाचणी आवश्यक आहे आणि मी तुमची परवानगी घेण्यापूर्वीच त्याची व्यवस्था केलीय. कारण वेळ मोलाचा आहे. पायोनियर-१० जवळ येत आहे.'' अध्यक्षांकडे पाहत फ्लेमिंग पुढे म्हणाले, ''नुकतीच तयार झालेली इलेक्ट्रॉन बीम फोटोग्राफीची उपकरणं घेऊन मी टाकेनोला तिकडे पाठवलं आहे SS-6 वरून.''

''पण त्यातून वेगळं काय दिसणार? फोटो घेण्यासाठी प्रकाशाऐवजी इलेक्ट्रॉन्स वापरायचे इतकंच.'' एक प्रतिनिधी म्हणाले.

''तसं झालं तर मी पायोनियर-१० हा खराखुरा समजेन. नाही तर...''

''नाहीतर काय?''

''तो 'ट्रोजन हॉर्स' आहे याबद्दल माझी खात्री होईल,'' डॉ. फ्लेमिंग मिस्कीलपणे म्हणाले. ग्रीक पुराणकथा त्यांच्या श्रोत्यांना अवगत नसल्याने त्यांच्या चेहऱ्यावर कुतूहल होते.

इतक्यात अध्यक्षांसमोरचा फोन वाजला. त्यांनी रिसीव्हर कानाला लावून काही ऐकले आणि फोन जागेवर ठेवला. ते शांतपणे उद्गारले.

''मित्रहो, टाकेनोचा संदेश आला. त्याने इलेक्ट्रॉन बीम फोटोग्राफीने पुष्कळ फोटो घेतले, पण ते सर्व फोटो कोरे आले!''

सर्वांचे डोळे फ्लेमिंगकडे वळले.

''माझा अंदाज खरा ठरला म्हणायचा! ते यान आपण पाठवलेलं नव्हे. ती एक प्रतिकृती आहे, पण अँटिमॅटरची! त्याभोवती कसलं तरी आवरण असावं, त्यामुळे त्याच्या आसपासच्या मॅटरशी संबंध येत नाही. हे आवरण कसं केलं असेल ते आपल्या तंत्रज्ञानाला अजून माहीत नाही. पण तसं आवरण तयार करून त्यात मूळ यानाची प्रतिकृती करून पाठवणं हे ज्यांना शक्य आहे ते तंत्रशास्त्रात आपल्या किती पुढे गेलेले आहेत याची कल्पना करावी. प्रकाशाला मॅटर आणि अँटिमॅटर समान तऱ्हेने वागवतात, म्हणून आपल्याला यानाचे आत-बाहेरचे फोटो व्यवस्थित घेता आले. पण इलेक्ट्रॉन बीमला ह्या आवरणातून प्रवेश मिळाला नाही. म्हणून त्याने घेतलेले फोटो ब्लँक आले. इलेक्ट्रॉन मॅटरचे असतात....''

मित्र हो, हे यान मित्रत्वाच्या भावनेने खचित आलेलं नाही. तुम्ही त्याचं पृथ्वीवर स्वागत करताना स्वत:चा नाश केला असतात. ते यान उघडलं की मॅटर आणि अँटिमॅटरचा संसर्ग घडून प्रचंड ऊर्जा निर्माण झाली असती - जिच्यापुढे आपली अण्वस्त्रांची ऊर्जा अगदीच तुटपुंजी पडली असती,'' डॉ. फ्लेमिंग म्हणाले.

''मग ह्या यानाचा नाश कसा करायचा?''

''ते अवघड नाही. आपण अंतराळातच रिमोट कंट्रोलने हे यान उघडू आणि त्यावर मॅटरचा वर्षाव करू. मात्र हे फार विलंब न करता केले पाहिजे.''

ठरल्याप्रमाणे सर्व घडले. तोतया यानाचा, नकली पायोनियर-१० चा नाश होताना झालेला प्रचंड स्फोट पृथ्वीवरून भर दिवसा दिसला. सुदैवाने त्याचे दुष्परिणाम जाणवले नाहीत.

''सुटलो बुवा! पृथ्वीला वाचवल्याबद्दल धन्यवाद, डॉ. फ्लेमिंग!'' USF चे अध्यक्ष उद्गारले.

पण डॉ. फ्लेमिंग यांची मुद्रा सचिंत होती. अनर्थ टळला खरा, पण ही मिळालेली उसंत तात्पुरती आहे याची जाणीव त्यांना अस्वस्थ करीत होती. ■ ■ ■

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

B.A-II (Sem 4) MLT

'द्विजगोरक्षण' या लीळेत सर्वज्ञ गोसावी हेच कसे साक्षात श्रीकृष्ण आहेत याचा प्रत्यय जसा ब्राह्मणास येतो तशीच प्रचिती आपणासही येते.

'ऐ हे रे : सामान्य पुरुख नव्हती : साक्षात श्रीकृष्णु : '

मग हा अनुभव पत्नीस सांगतांना तो म्हणतो, 'पैलू आमचीया गाइ राखे तो साक्षात श्रीकृष्णुः' यावरून भक्तांमध्येच नव्हे तर सामान्य लोकांमध्ये देखील ते साक्षात श्रीकृष्ण असल्याची श्रद्धा होती.

सर्व प्रकारच्या विद्या आणि कला त्यांना आत्मसात होत्या. अलौकिक अद्‌भुत असे त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. मेहकर वेथील बोणेबाईच्या कुटीत आलेल्या चोराला त्यांचे विराटदर्शन झाल्याने तो भयग्रस्त होवून पळाला. सर्वज्ञ चमत्कारांचा आधार फार क्वचित घेतात. कारण चमत्कारांचा ते स्वतः तिटकारा करतात. चांगदेवाच्या देवळात हजेरी लावण्यासाठी आलेल्या कलावंत-कलावंतीणींचा ताफा त्यांच्याकडे वेधला जातो. त्या त्या कलावंतांनी आपल्या कलांचे कौशल्य त्यांच्या समोर सादर केले, परंतु नृत्य करतांना नृत्यांगनेचा, ताल पदन्यास चुकला तेव्हा सर्वज्ञांच्या संकेत जाणून नृत्यांगना म्हणाली, ' जी जी जाणेवीण कळा मावळलीया जी : जाणेवीण कळा पोरटीया जालीया जीः आजी कळेचे माहेर भेटले : गोसावी सकळ विद्येचे माहेर' असे सर्वज्ञ कलाविद होते. आपल्या प्रत्ययाला येणाऱ्या ह्या लीळा म्हणजे ईश्वरीय व्यक्तित्वाच्या अगणित लीळांपैकी थोड्याफार प्रकाश शलाका आहेत. 'हत्तीचा दृष्टांत' याचा बोध देतो. आंधळ्यांनी हत्तीचा एकेक अवयव पाहून तोच हत्ती असल्याचा निर्वाळा दिला. वस्तुतः हे सर्व अवयव मिळूनच हत्ती असतो. आपण अनुभवतो त्या ईश्वराच्या सर्व शक्ती नाहीत तर साऱ्या शक्तींनी जो युक्त असतो तो परमेश्वर असतो. तात्पर्य म्हणजे 'लीळाचरित्र' या ग्रंथातील लीळा-कथा ईश्वरीय शक्तीच्या अनेक पैलूंपैकी काही पैलू आहेत.

सर्वज्ञांचे प्रबोधन कार्य

महाराष्ट्र ही प्रबोधनकारांची भूमी आहे. लोकाभिमुख सर्वज्ञांपासून तर लोकसंत गाडगेबाबापर्यंत समाज प्रबोधनाची लोकगंगा वाहती आहे. श्री चक्रधर स्वामी स्वतः ईश्वरीय अवतारी पुरुष असूनही ते सामान्यातील सामान्य आणि असामान्यातील असामान्य होते याची जाणीव प्रत्येक लीळेतून आपणास होते. सर्वज्ञ जसे प्रबोधनकार होते तसेत ते कृतीशील समाजसुधारक होते..... त्यांचे

विचार काळाच्या कसे पुढे होते, याची कल्पना आपणास 'उमाइनमस्कारे आंगुठा लावणे' या कथारूप लीळेवरून सहज येते.

वस्तुतः स्त्रियांचा मासिकधर्म हा एक नैसर्गिक शरीर धर्म आहे. स्वच्छता पाळणे ही गोष्ट वेगळी, पण विटाळ पाळणे किंवा मानणे ही गोष्ट निरर्थक असल्याचे जेव्हा ते सूचित करतात तेव्हा त्यांच्या क्रांतीकारी विचारांनी आपण अवाक् होतो. ते महान असे कृतीशील प्रबोधनकार होते याची मनोमन खात्री पटते.

उमाइसा विटाळशी असतांना दाराच्या कोपऱ्यात बसली होती. आपण अस्पर्श आहोत या खी सुलभ जाणिवेनुसार तिने दुरुनच सर्वज्ञांना नमस्कार केला तेव्हा त्यांनी मुद्दाम तिच्या कपाळास अंगठा लावला आणि 'बाइः या अंगठ्याला विटाळ केला' असा त्यांनी लटका आरोप केला. आता या अंगठ्याला पवित्र करण्यासाठी तीर्थस्थळी न्यावे लागणार असे सर्वज्ञ नागदेवाचार्यांना म्हणाले.

भांबावलेली उमाइसा म्हणाली, 'जीः जी : बीटाळू हे काइ जीः ?

सर्वज्ञे म्हणीतले : बाइ : यें नवद्वारे :

जैसी नाकी शेंबुड ये : डोळेया चीपडी एति :

कानां मळू ये : तोंडा थुंका ये : गुह्यद्वारा मळ एति :

तैसी ही एकी धातु स्रवे :'

आणि मासिक स्राव हा विटाळ नाही तर तो एक शरीरधर्म आहे हे चटकन उमाइसाला कळले आणि म्हणाली:-

'ना : जी : तरि आजिलागौनि न धरी जी :'

साध्या सरळ पद्धतीने लोकभाषेतून केलेले हे प्रबोधन अंजनासारखे गुणकारी ठरले.

महानुभाव पंथातील ग्रंथकार हे संस्कृतचे पंडित आणि विदग्ध कवी होते. पण त्यांना मराठीतच लेखन करण्याचा आदेश आद्य आचार्य नागदेवाचार्यांनी दिला. कारण ते सर्वज्ञांचा लोकाभिमुख दृष्टीकोण जाणून होते.

तत्त्वज्ञ श्री चक्रधर स्वामी :-

भगवान श्रीकृष्ण जसे चक्रवर्ती असूनही महान तत्त्वज्ञ होते; दर्शनकार होते तसेच गोसावी चक्रधर -चक्रपाणी तर होतेच पण ते तत्त्वज्ञही होते. त्यांच्या असंख्य सूत्रांमधून हे तत्त्वज्ञान आढळते. सर्वज्ञांच्या मुखी जी सूत्रे आली त्यांचे संकलन- संपादन केसोबासांनी 'सूत्रपाठ' या ग्रंथात केले, अशी १२५५ सूत्रे या ग्रंथात आढळतात.

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

अक्षर घटवण्यासाठी त्याला आता हातात पाटी-पेन्सिल घ्यायची गरज नसते. पण आपल्या विद्यार्थ्यांला शिकवण्यासाठी तो स्वत: हातात पाटी घेतो. त्या मुलापुढे स्वत: पाटीवर लिहितो. हे लिहिणे स्वत:साठी नसते. त्या मुलासाठी असते. त्याने शिकावे म्हणून असते. संतांचे जगातील कार्य असेच असते, असे तुकाराम म्हणतात. पंतोजी जसा स्वत: अक्षरे लिहून विद्यार्थ्यांला लिहिण्याचा धडा देतो, तसे संत स्वत: कार्य करून लोकांना कार्याचा धडा देतात. या उदाहरणाला जोडून त्यांनी दिलेले आईचे उदाहरणही अत्यंत प्रभावी आहे. आईला स्वत:ला चालता येत असूनही ती जाणीवपूर्वक मुलाच्या पावलांबरोबर छोटी छोटी पावले टाकते. मुलाला 'तुझा तू चालायला शीक' असे म्हणून तो चालायला शिकणार नाही. 'तुझा तू लिहायला शीक' असे म्हणून तो लिहायला शिकणार नाही. म्हणून हे सगळे करायचे. समाजातील भोळी-भावडी, सर्वसामान्य माणसेही या मुलासारखीच असतात. म्हणूनच, त्यांनी जसे वागावे अशी संतांची इच्छा असते, तसे ते स्वत: वागतात आणि लोकांपुढे आदर्श ठेवतात. संत होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने अशा रीतीने आपल्या आचरणाने लोकांना धडा घालून दिला पाहिजे, हेच तुकारामांनी या अभंगातून सूचित केले आहे. त्यांनी कर्जखते बुडवली आणि आपल्या आचरणाने लोकांपुढे नैतिकतेचा आदर्श ठेवला, याचा अर्थ हाच होता.

४३ जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुले ।।१।।
तो चि साधु ओळखावा । देव तेथे चि जाणावा ।।२।।
मृदु सबाह्य नवनीत । तैसे सज्जनाचे चित्त ।।३।।
ज्यासि आपंगिता नाही । त्यासि धरी जो हृदयीं ।।४।।
दया करणे जे पुत्रासी । ते चि दासा आणि दासी ।।५।।
तुका म्हणे सांगू किती? । तो चि भगवंताची मूर्ती ।।६।।

(अ.क्र.३४७)

मानव्याची उदात्ततम अवस्था म्हणजे ईश्वर, ही धारणा तुकारामांनी वारंवार व्यक्त केली आहे. याविषयीच्या त्यांच्या या विख्यात अभंगाचा आशय पुढीलप्रमाणे आहे, ''रंजल्या-गांजल्या लोकांना जो 'आपले' म्हणतो, तोच खरा साधू असल्याचे जाणावे आणि देव त्याच्याजवळच, त्याच्यामध्येच राहतो, हे ध्यानात घ्यावे. लोणी जसे आतही आणि बाहेरही मऊ असते, तसेच सज्जनाचे मन अंतर्बाह्य मृदूच असते. मी तुम्हांला सांगू तरी किती? ज्याला कोणी सांभाळणारे नाही अशा

माणसाला जो हृदयाशी धरतो आणि आपल्या पुत्रावर जे प्रेम करायचे तेच स्वत:च्या दासावर आणि दासीवरही करायचे असे वागतो, तोच भगवंताची मूर्ती होय.''

तुकारामांचा केवळ हा एक अभंग पाहिला, तरी त्यांची ईश्वराची संकल्पना काय होती, हे स्पष्ट होऊन जाते. विशेष म्हणजे त्यांची साधुत्वाची व देवत्वाची कसोटी एकच असल्यामुळे त्यांच्या दृष्टीने साधुत्व व ईश्वरत्व एकरूपच आहे, तादात्म्य पावलेले आहे. त्यांनी लावलेली ही कसोटी कोणत्याही प्रकारच्या धर्मग्रंथाच्या प्रामाण्याशी जोडलेली नाही, की आणखी कोणत्याही प्रकारच्या चाकोरीबद्ध धार्मिक विचारप्रणालीमध्ये जखडलेली नाही. त्यांनी लावलेली कसोटी ही नि:संदिग्धपणे इहलोकीच्या माणूसकीशी जोडलेली आहे. समतेच्या आणि न्यायाच्या तत्त्वावर अधिष्ठित आहे. जे प्रेम आपल्या पुत्रावर करायचे, तेच दासदासींवरही करायचे, ही भगवंत बनण्याची कसोटी समतेच्या अत्युच्च अधिष्ठानावर उभी आहे, हे अगदी उघड आहे. जेथे दया, क्षमा आणि शांती असते तेथे देवाची वसती असते, देव धावत धावत अशा घरात पोचतो आणि तेथेच जागा पकडून राहतो, या अर्थाचा त्यांचा अभंग, सदाचरण हीच देवत्वाची कसोटी असल्याचे सांगतो.

४४ काय वाणू आता? न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसे ।।१।।
थोरीव सांडिली आपुली परिसें । नेणे सिवो कैसे लोखंडासी ।।२।।
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें ।।३।।
भूतांची दया हे भांडवल संतां । आपुली ममता नाही देहीं ।।४।।
तुका म्हणे सुख पराविया सुखें । अमृत हे मुखें स्रवतसे ।।५।।

(अ.क्र.१५१०)

लोकांचे कल्याण करण्यासाठी प्रसंगी स्वत:कडे कमीपणा घेऊन संत त्यांच्यावर उपकार करीत असतात. हा त्यांचा स्वभावधर्मच असतो. सर्वसामान्य माणसे सामान्यत: आधी स्वत:च्या हिताचा विचार करतात आणि मग जमल्यास इतरांना थोडीबहुत मदत करतात. अनेकांना मात्र तसे करण्याची इच्छाही होत नाही. सामान्य माणसे आणि संत यांच्यामध्ये असे अंतर असते. संतांचा हा स्वभाव तुकारामांच्या मनाला भिडला आहे. म्हणूनच ते त्यांच्या विचारांचे, आचरणाचे,

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

B.A II (Sem 4)

हे कुठून आले कपडे ? जगताप, तुरुकमाने जरा चांगलेच पोरं होते. त्यांनी म्हटले हे जरूर रंगलेले कपडे यांनी घेतलेत. मी नाही हो म्हणत 'हो' म्हणालो त्यांना हे सारं पाहून वाईट तर वाटलंच पण चांगले धुऊन घेऊन वापरतोय म्हणून बरेही वाटले. तेव्हापासून ते माझ्या आणखी जवळ आले व मला केव्हाही काही नसले की देयाला लागले.

त्या वाड्यात राहणाऱ्यांपैकी जवळपास प्रत्येक जण आपापल्या परीने कष्ट करून पदवीधर होऊन चांगले जीवन जगताहे पण ज्या माणसांचे मी चांगले भरलेले, टाकून दिलेले कपडे धुऊन वापरले व माझी इज्जत झाकली तो मला पदवीधर न होता तेव्हा मजा मारल्यामुळे का कोणास ठाऊक आता प्राथमिक शाळेत चाकरी करताना कालपरवाला भेटल्यामुळे बड्या गिरणीजवळ भेटल्याचा आनंद झाला पण तेवढेच वाईटही वाटले त्याला तसे पाहून. याचा अर्थ असा नव्हे की मी फार मोठा झालोय व त्याला कमी लेखतो पण मित्र थोडासा पुढे जायला हवा होता एवढेच काय ते वाटते.

***

उंटावरचा प्रवास

काल परवाची गोष्ट आहे ही. काल परवा म्हणजे नोव्हेंबरच्या १ तारखेला गावाकडे जाण्याचा बेत केला नि निघालो जायाला. रात्री औरंगाबाद ते उदगीर एस.टी. ने.

जवळ जवळ महाराष्ट्रभर निदान मराठवाड्यात तर पावसाचा थेंब नव्हता. गेल्या दोन-तीन महिन्यांपासून. गाडी शहागड ते अंबडला येताच थोडा फार पाऊस पडला आणि आम्हाला खूपसा आनंद झाला. आमची कल्पनाशक्ती औरंगाबादच्या हरसूल तलावाची पातळी वाढवू लागली. बीड सोडताच गाडीचा ब्रेक डाऊन झाला. तब्बल दोन तास. नंतर अंबाजोगाई ओलांडून निघाली गाडी अहमदपुराकडे व अहमदपुरला जवळ जवळ दोन अडीचच्या दरम्यान आलो व थोडा वेळ थांबली. मी तेव्हा इकडे तिकडे नजर फिरविली तर त्या काळोखातही बराचसा फरक दिसून येत होता.

अहमदपूरबद्दल मला आकर्षण वाटतं याच कारण म्हणजे मी तेथे त्या सरकारी शाळेचा विद्यार्थी होतो. आज त्याला जवळजवळ बारा वर्षे लोटाताहेत. त्यावेळेचे अहमदपूर व आजचे अहमदपूर यामधील चमत्कारिक अंतर पाहून मनाला थोडा विस्मयच वाटला. तेव्हा काहीच नव्हतं. आता तिथे मोठमोठ्या आधुनिक इमारती, दुरुस्त अशा सडका, रस्ते, आडत दुकाने, कॉलेज व एस.टी. चे भव्य नसले तरी टुमदार असे बसस्थानक. हे सारे काही नवीनच.

हं हं म्हणता अहमदपूर ओलांडून गाडी शिरूर ताजबंद सोडून केव्हा उदगीरच्या रस्त्याला लागली हे काही कळलेच नाही. कारण रात्रभरची झोप व सारखा अधूनमधून अहमदपूरचाच विचार. लेट झालेली गाडी मेकप करून कशी का व्हईना आली एकदाची उदगीरला. अगदी सकाळी सहाला बसस्थानकाकडे न जाता अलीकडे लोक उतरू लागले. काही लोक सूतगिरणीजवळ तर काही आर्यनिवास हॉटेलजवळ उतरले. आम्हीही बसस्थानकाकडे जाण्याचा विचार सोडून उतरलो जनरल हॉस्पिटलच्याजवळ. कुठे जावे हा विचार मनात होताच. पण ताडकन विचार सुचला नि घेतली रिक्षा व गेला माधव भुत्ताळेच्या घरी. रेल्वेस्टेशनजवळ लिंबाच्या झाडाजवळ

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

B.A III (sem 5)

हे ऐकल्यावर इनामदाराने चमकून तिच्याकडे निरखून पाहिले. आंबुजानला दिवस गेले आहेत याची त्याला खात्री पटली. चिंताक्रांत होऊन तो तिच्याकडे बराच वेळ बघत उभा राहिला. विचार करीत थांबला.

मग एकाएकी त्याने महादाला हाक मारली,

'महाद्या भडव्या–'

––आणि चिलीम बाजूला ठेवून पळत आत आलेल्या महादाला उद्देशून तो लांबूनच ओरडून म्हणाला,

'महादा, आत्ताच्या आत्ता तालुक्याला जा आणि एक बाई डॉक्टर ताबडतोब घेऊन ये !'

❄

१२.

माझ्या बापाची पेंड

कोंबडी आरवायची थांबली होती. थंडीने खुडुक होऊन बसलेली बाहेर होती. आणि आता दाणे टिपीत उकिरड्यावर तुरूतुरू हिंडत होती. दिवसा थोडासा वर आला होता. शाळेचा गजर लांबून ऐकू येत होता. गजर म्हणजे पहिली घंटा. म्हणजे शाळा सुरू व्हायला आता अगदी थोडा वेळ होता.

आई घरात चुलीपाशी बसली होती आणि काटवटात पीठ घेऊन मळत होती. बा चिलीम ओढत होता. चिलमीखालची मळकी चिंधी पुन्हा पुन्हा नीट करत होता. चिलमीचा विस्तु मोठा मजेशीर फुलत होता.

मी दप्तरात शाळेची बुके भरीत होतो.

पाटी घालून दप्तर बांधल्यावर मी आईकडे गेलो. तिच्याभोवती नाचत म्हणालो,

'आयो, मला भुका लागल्यात ग. खायला दे.' पण आईने माझ्याकडे ढुंकूनसुद्धा बघितले नाही. पीठ मळून मळून तिचे हात पांढरेफेक झाले होते. काकणांना सुद्धा पीठ चिकटलेले होते. आपला हात तसाच वर उगारून ती म्हणाली,

'उजाडला का दीस तुला ? चल, चालता हो. साळंला उशीर हुईल. आल्यावर भाकरी खा. जा, ऊठ. नीघ.'

मी तोंड वेडेवाकडे केले. कपाळाला आठ्या घातल्या. हा अपमान सहन करणे अशक्य होते. सामोपचाराने काम भागत नाही तर ! ठीक आहे. मग आवाज धारदार केला. म्हणालो,

'बघ हां–तुझा इस्तुच इझवतो.'

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Ta. Daryapur, Dist. Amravati

3.A III (Sem 5)
MLT

साहित्याची निर्मितिप्रक्रिया

म. सु. पाटील

निर्मिती करणे याचा साधा अर्थ, आतापर्यंत अस्तित्वात नसलेली वस्तू अस्तित्वात आणणे. ही वस्तू ज्ञानेंद्रियांनी आकळण्यासारखी मूर्त स्वरूपाची असेल वा केवळ कल्पनाशक्तीने जाणण्यासारखी अमूर्त स्वरूपाची असेल. या दृष्टीने कोणतेही चित्र, शिल्प, नृत्य, नाटक; कोणतीही कविता, कादंबरी वा कथा या गोष्टी जशा निर्माण केलेल्या असतात त्याप्रमाणे न्यूटनचा गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त, आईनस्टाइनचा सापेक्षतावादाचा सिद्धान्त, शंकराचार्य यांचा अद्वैतवाद वा ज्ञानदेवांचा चिद्‌विलासवाद या गोष्टीही निर्मिती या नावाला पात्र ठरतात. माणसाला आपले मनुष्यत्व निर्मिती करण्यामध्ये अनुभवाला येते. केवळ मनुष्ययोनीमध्ये आपण जन्माला आलो म्हणून आपण माणूस ठरत नाही. निर्मिती करण्याच्या प्रक्रियेमध्ये आपणांस आपले मनुष्यत्व प्राप्त करून घ्यावे लागते. काही असामान्य प्रकृतीचे लोक अनेक प्रकारच्या कलाकृती निर्माण करीत असतात, नवीन नवीन वैज्ञानिक शोध लावीत असतात; नवीन नवीन तत्त्वज्ञानांची उभारणी करीत असतात किंवा नवे नवे विचार मांडीत असतात. सामान्य माणसाला अशी निर्मिती करता येत नसली तरी त्याच्या ठिकाणी निर्मितीची शक्ती नसते असे नाही. एके काळी तो माती, पाणी, दगड असे सुटे सुटे, विखुरलेले पदार्थ एकत्र करून स्वत:चे घर स्वत:च्या कल्पनेप्रमाणे बांधीत होता. जमिनीची मशागत करून स्वत:ला लागणारे धान्य तो स्वत: पिकवीत होता. त्यासाठी लागणारी वेगवेगळ्या प्रकारची अवजारे त्याने शोधली. आजही हा प्रकार थोड्याफार प्रमाणात खेडेगावात चालू आहे. अशा प्रकारची कृती करताना माणूस त्याच्या बाह्य जगामध्ये जशी एक वस्तू रचून अस्तित्वात आणीत असतो त्याचवेळी तो आपल्या अंतरंगामध्ये आपल्या भावभावनांची, इच्छांची, किंबहुना आपल्या मनाची त्या वस्तूला अनुरूप अशी नवी रचना करीत असतो. माणसाच्या मनाची नवी रचना आणि बाहेरील सुटे सुटे पदार्थ एकत्र करून तयार केलेली नवी वस्तू या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडत असतात.

प्रत्येक नवी वस्तू तयार करताना माणसाच्या मनाची नवी रचना आकाराला येत असते. यालाच आपण माणसाच्या मनुष्यत्वाचा विकास असे म्हणतो. माणूस आपल्या भोवतालची परिस्थिती जशी आहे त्या स्वरूपात न स्वीकारता तिच्यामध्ये सतत बदल करीत आलेला आहे, तिची पुनर्रचना करीत आलेला आहे. आणि असा बदल करताना, पुनर्रचना करताना स्वत: बदलत गेला आहे, स्वत:ला रचीत

गेला आहे. एक नवी वस्तू प्रत्यक्षात आणण्याची, आपल्या परिस्थितीची पुनर्रचना करण्याची आणि त्याबरोबर स्वत:ला नव्याने रचण्याची कृती ही माणसाला सतत आनंददायक वाटत आलेली आहे. या आनंदात परिस्थितीच्या पलीकडे जाण्याचा, तिच्या मर्यादा, बंधने ओलांडण्याचा भाग जसा बराच असतो, त्याप्रमाणे स्वत:च्या मर्यादा ओलांडून पलीकडे जाण्याचा, स्वत:चीच नवी ओळख करून घेण्याचा भागही मोठा असतो. अमुक एक वस्तू निर्माण करी पर्यंत ती गोष्ट निर्माण करण्याची कुवत आपल्यात होती हे माणसाला कधी कळत नाही. तिची जाणीव ती कृती करताना होते. ही त्याला स्वत:चीच होणारी नवी ओळख होय. निर्मितीची क्षेत्रे विज्ञान, तत्त्वज्ञान, तंत्रज्ञान वगैरे अनेक असली तरी अशी ओळख कलावंताला कलानिर्मितीमध्ये सर्वांत अधिक होते. याचे कारण वरील क्षेत्रांतील निर्मितीमध्ये केवळ बुद्धीच्या व्यापाराला जसे प्राधान्य असते तसे कलानिर्मितीमध्ये घडत नाही. कलानिर्मितीत मनाच्या सगळ्या शक्ती क्रियाशील होतात. त्यामुळे त्या निर्मितीत आनंदही अधिक आहे.

यापुढे आपण कलानिर्मितीच्या संदर्भात साहित्यनिर्मितीचा विचार करणार आहोत. आज निर्मितीच्या आनंदाला माणूस पारखा होत चाललेला आहे. आजचे युग हे निर्मितीपेक्षा उत्पादनाचे युग आहे. नव्या नव्या वैज्ञानिक शोधांबरोबर नवे नवे तंत्रज्ञान आले. हे शोध आणि तंत्रज्ञान मानवाची निर्मितीच होय. पण त्याचा उपयोग करून झालेल्या औद्योगिकीकरणामुळे मोठे मोठे कारखाने अस्तित्वात आले. त्यांत मोठी मोठी यंत्रे बसवली गेली. आणि माणूस त्या यंत्रांचा एक विस्तारित भाग म्हणून यांत्रिक कामे करू लागला. साधे कापड घेतले तरी स्थूलपणे बोलायचे तर, शेतकऱ्याने एका ठिकाणी पिकवलेला कापूस दुसऱ्या ठिकाणी पिंजला जातो; तिसऱ्या ठिकाणी त्याचे सूत तयार होते; चवथ्या ठिकाणी त्याला ताण्याचा आकार प्राप्त होतो; पाचव्या ठिकाणी त्याला खळ दिली जाते आणि सहाव्या ठिकाणी कापड विणले गेलेले दिसते. यात मानवी कृती फार अल्प असते. धागा तुटला तर तो सांधणे यापेक्षा माणूस अधिक काही करत नाही. पहिल्या कृतीखेरीज साऱ्या कृती यंत्राने होत असतात. त्यामुळे हे मी तयार केलेले कापड असे काही यंत्रावर काम करणाऱ्या माणसाला वाटत नाही. त्यामुळे हे पुस्तकाचे एकादे मुखपृष्ठ पाहून जसे काही लोक ते कोणत्या चित्रकाराचे आहे हे ताबडतोब ओळखतात, अमुक कविता ही बालकवींची किंवा मर्ढेकरांची किंवा पु. शि. रेगे यांची हे काही रसिक केवळ कविता ऐकून जसे अचूक जाणतात, तसे ते कापड अमुक विणकराचे असे काही कोणाला जाणवत नाही. याचे कारण, निर्मिती ही एका व्यक्तीच्या मनाने केलेली असते, त्या व्यक्तीच्या मनाचा ठसा त्याच्या निर्मितीवर उमटलेला असतो; म्हणूनच ज्ञानेश्वरी लिहिणारे ज्ञानदेव आणि अभंग

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

दुरीताचे तिमिर जावो...

B.A III (Sem 6) MCQ

डॉ. कार्व्हरांची आता सत्तरी उलटली होती. नाही म्हटलं तरी टस्कीगीत येऊन चाळीस वर्षं झाली होती. वयाबरोबर कामाचा व्यापही वाढला होता. पण अजूनही पहाटे चारलाच उठून, झाडीतून हिंडून येणं थांबलं नव्हतं.

त्यांना येणाऱ्या पत्रांचा वेग एवढा वाढला होता की पत्रव्यवहार सांभाळण्यासाठी, वेळेवारी उत्तरं देण्यासाठी दोन सेक्रेटरी दिवसभर गुंतलेले असायचे.

१९३४ साली अमेरिकेच्या कृषिखात्याने त्यांची आपल्या Mycology & Plant Disease Survey या विभागाचे सहसंचालक म्हणून नेमणूक केली. या नेमणुकीमुळे त्यांची फारच धावपळ होऊ लागली. त्यांच्या एकट्याच्याने काम रेटेना. मदतनिसाची गरज भासू लागली.

'गेल्या चाळीस वर्षांत तुम्ही पगारवाढ कधीच स्वीकारली नाहीत. पगारवाढ नको तर कमीत कमी हाताशी एखादा मदतनीस तरी घ्या,' असा संस्थेच्या अध्यक्षांनी, श्री. पॅटरसननी, आग्रह धरला. डॉ. कार्व्हरनीही विचार केला. या उभारलेल्या व्यापाची धुरा यशस्वीपणे वाहू शकणारा एखादा 'वारसदार' तयार करणं आवश्यक होतं. हुशार आणि तडफदार तरुण तयार करणं प्राप्त होतं.

नॉर्थ कॅरॉलिना येथील शेतीविषयाचे तरुण प्राध्यापक श्री. ऑस्टिन कर्टिस यांची मदतनीस म्हणून निवड करण्यात आली. या तरुणाला पाहताक्षणी डॉ. कार्व्हरना काय आवडलं असेल, तर त्याचे चलाख आणि खोल डोळे. असेच डोळे नीट 'बघू' शकतात. त्यांच्या या होऱ्याचं प्रत्यंतर त्यांना लवकरच आलं.

श्री. ऑस्टिन कर्टिस यांनी प्रयोगशाळेत 'मॅग्नोलिया'च्या बियांपासून रंग बनवला. या प्रयोगामागची आपल्या शिष्यवराची स्वतंत्र प्रज्ञा पाहून डॉ. कार्व्हर संतोषले. डॉ. कार्व्हर यांच्या प्रयोगशाळेच्या बंद दाराआड प्रथमच आणखी एक 'सत्यशोधक' सिद्ध झाला. □

आपल्या निरनिराळ्या कसोट्यांतून तावून-सुलाखून निघालेल्या अशा या शिष्याबद्दल डॉ. कार्व्हरना कौतुक होतं. कर्टिसच्या आई-वडिलांना पत्र पाठवून त्यांनी आपली भावना व्यक्त केली होती.

"माझा स्वत:चाही विश्वास बसला नसता इतका ऑस्टिन माझ्या आयुष्याचा आणि कार्याचा महत्त्वाचा भाग होऊन बसला आहे. तो बुद्धिमान आहे. सर्जनशील आहे. त्याची साथ मला लाभली, याचा मला आनंद वाटतो. त्याच्या येण्याने माझं आयुष्य नक्कीच वाढलं आहे."

गरीब बांधवांना वरदायी ठरणारं त्याच संशोधन [illegible]
अनेक प्रकारचे रंग कर्टिसने तयार केले. हे स्वस्त आणि मस्त रंग पुढे 'कॉटस ब्राऊन्स' [illegible]
ओळखले जाऊ लागले. त्याच्या या संशोधनाचा डॉ. कार्व्हर यांना फार अभिमान वाटे.

डॉ. कार्व्हर कर्टिसला 'बाळ' म्हणून हाक देत. इतर सहकारी त्यांच्यातील पिता-पुत्र संबंध जाणून कर्टिसला 'छोटा कार्व्हर' म्हणत.

आपल्यावर पुत्रवत प्रेम करणारा, आपली काळजी वाहणारा, आपल्या कार्याची धुरा समर्थपणे सांभाळणारा 'वारस'—एक डोळस शिष्य—त्यांना आयुष्याच्या अखेरीस लाभला होता.

एका काम करण्याच्या संधीखेरीज कर्टिसने त्यांच्याकडे अधिक काही मागितलं नव्हतं. ज्ञानार्जनासाठी सतत उत्सुक असलेला हा शिष्योत्तम त्यांना अत्यंत प्रिय होता. 'इतकी वर्षं आपण कर्टिसशिवाय कशी काढली' याचाच त्यांना अचंबा वाटे. त्यांच्या या मानसपुत्राने त्यांची अत्यंत आत्मीयतेने, प्रेमाने देखभाल केली.

डॉ. कार्व्हर यांची वृत्तपत्राद्वारे जगाला ओळख करून दिली ती या कर्टिसनेच. वेळोवेळी वृत्तपत्रकारांच्या परिषदा घेतल्या. त्यांत त्यांनी डॉ. कार्व्हरांच्या अनन्यसाधारण कार्याची तपशीलवार ओळख करून दिली.

काही वर्षांपूर्वी न्यू यॉर्कमधील मार्बल कॉलेजिएट चर्चमध्ये त्यांना व्याख्यानासाठी निमंत्रित करण्यात आलं होतं. ते म्हणाले होते,

"परमेश्वराने माणसाला बुद्धी दिली आहे, ज्ञान दिलं आहे, ते लोकांची सेवा करावी म्हणून..."

पुढे ते म्हणाले,

"माझ्या प्रयोगशाळेत पुस्तकं नसतात. ज्या वेळी काही नवीन जन्माला घालण्याची आवश्यकता असते तेव्हा मला आपोआप कल्पना सुचत जातात. काय करावं ते आतून कळतं."

त्यांच्या या विधानावर जगभरच्या वृत्तपत्रांनी काहूर उठवलं. 'डॉ. कार्व्हरांचं हे विधान त्यांच्यातील शास्त्रीय दृष्टिकोनाचा (वैज्ञानिक वृत्तीचा) अभाव दर्शवतं. खरा केमिस्ट कधी पुस्तकाला नगण्य समजत नाही आणि आपल्या यशाचं श्रेय स्वत:च्या आतल्या आवाजाला देत नाही.' ('न्यू यॉर्क टाइम्स'चा अग्रलेख.)

ह्या काहुराने डॉ. कार्व्हर व्यथित झाले. त्यांच्या विधानाचा विपरीत अर्थ लावण्यात आला होता. परमेश्वराच्या मदतीखेरीज आणि पुस्तकांच्या मार्गदर्शनाखेरीज संशोधन कधीच पूर्ण होत नाही. पण ज्या गोष्टी आधीच शोधण्यात आल्या होत्या, आधीच सिद्ध झाल्या होत्या, त्यांचा नव्यानं मागोवा घेण्यात काय अर्थ होता? ते सर्जनशील शास्त्रज्ञ होते. पूर्वी कधीच जे उजेडात आलं नव्हतं, ते त्यांना लोकांसमोर आणायचं होतं. जी गोष्ट यापूर्वी सिद्ध झालेली नव्हती तिची साधनं, तिचा मार्ग पुस्तकांत कसा काय सापडणार? मग जुने मार्ग चोखाळून काय फायदा? त्याचबरोबर हेही खरं होतं, की नवीन वाटा शोधण्याचं सामर्थ्य, बौद्धिक कुवत त्यांनी अभ्यासानेच मिळवली होती. काही नवीन घडवण्यास आवश्यक ते पूर्वज्ञान त्या विषयाच्या सखोल अभ्यासातूनच त्यांनी मिळवलं होतं. अशी पुस्तकं त्यांनी अभ्यासली नसती, तर त्यांना देवाच्या मार्गदर्शनाचा लाभ

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

भाषा संपादन करण्याचे सामर्थ्य असल्यामुळेच मानवाला भाषा शिकणे शक्य होते. माणूस आणि इतर प्राणी यांच्या भाषा संपादन-प्रक्रियेची तुलना केल्यानंतर हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल.

(मानवी मेंदूमध्ये भाषा संपादन करण्याचे जे सामर्थ्य असते त्याला 'भाषिक क्षमता' असे म्हणतात.) या भाषिक क्षमतेमुळे वयाच्या पाचव्या वर्षांपर्यंत मूल मातृभाषा पूर्णपणे आत्मसात करते. पाचव्या वर्षी भाषा शिकण्याची क्रिया जवळ-जवळ पूर्ण झालेली असते. त्यानंतर मूल नवनवे शब्द मुख्यत्वे शिकत असते. वयाच्या सहाव्या वर्षांपर्यंत मुलाला भाषा शिकता आली नाही, तर पुढे त्याला निसर्गसुलभ सहज प्रक्रियेनुसार भाषा येत नाही, हे आता प्रयोगाने सिद्ध झाले आहे. भाषा न येणाऱ्या मुलाच्या मेंदूत भाषा संपादन करण्याची शक्तीच नसते. 'भाषिक क्षमता' ही निसर्गाने फक्त माणसालाच दिलेली देणगी आहे. तुम्ही घरात पाळलेल्या कुत्र्याच्या कानावर सतत मराठी भाषा पडत असते. पण कुत्रा मराठी बोलायला लागला असे दिसत नाही. तो कुत्र्याचीच भाषा वापरत असतो. कारण मानवेतर प्राण्यांच्या मेंदूत कानांवर पडलेली भाषा संपादन करण्याची शक्ती नसते. येथवर केलेल्या विवेचनावरून मानवेतर प्राण्यांची भाषा आणि माणसाची भाषा यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आपल्याला सांगता येईल.) मानवेतर प्राण्यांची भाषा आनुवंशिक असते. ती त्यांना उपजतच येत असते. मानवी मेंदूची क्षमता अशी सीमित नसते. मानवी मेंदूमध्ये भाषा संपादन करण्याचे सामर्थ्य असते. या 'भाषिक क्षमते'च्या आधारे कानावर पडलेली भाषा मानवी मूल शिकत असे.

२. भाषेचे स्वरूप :

रेडिओ किंवा दूरदर्शनचा संच बाहेरून बघितला तर खूपच सुबक आणि आकर्षक दिसतो. पण मागच्या बाजूने तो उघडला की त्याच्यात वेगवेगळ्या खूपच गुंतागुंतीच्या रचना केलेल्या आहेत असे दिसते. भाषेचे स्वरूप असेच गुंतागुंतीचे असते. प्रत्येकाला स्वत:ची भाषा येत असल्यामुळे ती खूप सोपी आहे असे वाटत असते. पण कोणत्याही भाषेचे स्वरूप आपण समजावून घ्यायला लागलो की तिच्यात दूरदर्शन संचाप्रमाणे खूपच गुंतागुंतीच्या रचना आहेत असे लक्षात येते. भाषेतील वेगवेगळ्या स्वरूपाच्या रचना आता आपण विस्ताराने समजावून घेऊ. भाषेचे स्वरूप कसे असते ते त्यावरून स्पष्ट होईल.

ध्वनींच्या सानुक्रम रचना :

भाषा ध्वनींची बनलेली असते. पण मानवी भाषेत ध्वनी कधीही सुटा सुटा वापरला जात नाही. ध्वनींच्या रचना वापरल्या जातात. अ, र, ग, ज, स हे मराठी

भाषेतील काही ध्वनी आहेत. पण भाषेत ते सुटेपणाने कधीच वापरले जात नाहीत. सुट्या सुट्या ध्वनींना मानवी भाषेत अर्थसुद्धा नसतो. मराठीत हे ध्वनी इतर ध्वनींबरोबर रचना करून वापरले जातात. मगच त्यांना अर्थ प्राप्त होतो. उदाहरणार्थ 'रस' आणि 'जग' या रचना वरील ध्वनींपासून तयार करता येतात. भाषेत अशा रचना वापरल्या जातात.

ध्वनींच्या रचना कोणत्या अनुक्रमाने करायच्या याचे नियम त्या त्या भाषेत रूढीने ठरलेले असतात. विशिष्ट अनुक्रमाने केलेल्या रचनांना सानुक्रम रचना असे म्हणतात. क, म आणि ळ हे तीन ध्वनी याच क्रमाने आले तर त्यातून 'कमळ' ही अर्थपूर्ण रचना तयार होते. 'मकळ' या रचनेत ध्वनी तेच आहेत. पण त्यांचा अनुक्रम बदललेला आहे. या अनुक्रमाला मराठीमध्ये अर्थ नाही. हीच गोष्ट इंग्रजीच्या बाबतीतही दिसते. Pot हा अर्थपूर्ण अनुक्रम आहे. Otp या अनुक्रमाला इंग्रजी भाषेत अर्थ नाही.

ध्वनि-अर्थसंकेत :

ध्वनींची रचना केवळ सानुक्रम असून भागत नाही. भाषेमध्ये प्रत्येक सानुक्रम रचनेच्या मागे एक अर्थाचा संकेत असतो. 'कमळ' म्हणजे गुलाबी रंगाचे पाण्यात उमलणारे सुंदर फूल किंवा 'गाय' म्हणजे चार पाय, शेपूट, शिंगं असलेला दूध देणारा प्राणी - हे अर्थांचे संकेत 'कमळ' आणि 'गाय' या सानुक्रम रचनांच्या मागे आहेत. इथे एक लक्षात घ्यायला हवे की अनुक्रमाप्रमाणे अर्थाचे संकेतसुद्धा रूढीनेच ठरलेले असतात. सानुक्रम रचना आणि तिचा अर्थ यांच्यामध्ये कोणताही कार्यकारण संबंध नसतो. गाईला गायच का म्हणायचे, कमळ का नाही, याचे कोणतेही कारण आपण देऊ शकत नाही. फार तर आपण असे उत्तर देऊ शकू की 'गाईला गाय म्हणायची रूढी किंवा पद्धत मराठी भाषेत आहे म्हणून आम्ही गाईला गाय म्हणतो.' भाषा ही 'रूढी' आहे असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा त्याच्यामागे हा अर्थ असतो. मराठीमध्ये 'कमळ' या रचनेमागे रूढीने दिलेला अर्थ आहे. म्हणून 'कमळ' हा मराठीतील शब्द ठरतो. 'मकळ' या रचनेमागे रूढीने दिलेला अर्थ नाही. म्हणून 'मकळ'चा समावेश मराठीच्या शब्दसंग्रहात होत नाही.

भाषेचे स्वरूप समजावून घेताना पुढील चार गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात.

१) भाषा ध्वनींची बनलेली असते.

२) मानवी भाषेत सुटे ध्वनी वापरले जात नाहीत तर ध्वनींच्या रचना वापरल्या जातात.

३) भाषेतील ध्वनिरचना सानुक्रम असतात व त्यांच्यामागे अर्थसंकेत असतो.

४) रचनेचा अनुक्रम व तिच्यामागील अर्थसंकेत यादृच्छिक असतात; म्हणजे

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

ARTS-COMMERCE COLLEGE, YEODA

DEPARTMENT OF ENGLISH

HUMAN VALUES AND ETHICS

REFLECTED IN THE SYLLABI

SESSION 2018-19 TO 2022-23

	B.A. PART (I)	
Sr. No.	**Title of the Lesson/ Poem**	**Human Values Reflected**
	PROSE	
01	The Happy Prince – Oscar Wilde	Significance of Sacrifice
02	Education Provides A Solid Foundation – A.P.J. Abdul Kalam	Hard work, Perseverance
03	Speeches at the Parliament of World's Religions – Swami Vivekananda	Tolerance, Universal Harmony
04	The Responsibilities of Young Citizens – Lal Bahadur Shastri	The Responsibilities of Young Citizens
05	The Dispenser of Holy Water - Guy De Maupassant	Steadfast Faith and Willingness to fight Adverse Situations
06	A Career – R. K. Narayan	Importance of Struggle
07	In Sahyadri Hills, A Lesson In Humility – Sudha Murthy	Significance of Simplicity& Sacrifice

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

Dr Anil M. Katrojwar
Head, Department of English
Arts, Commerce College,Yeoda

	POETRY	
08	Indian Weavers- Sarojini Naidu	Indianness
09	Success – Emily Dickinson	Value of Success and Pains of Defeat
10	A Psalm of Life – H.W. Longfellow	Value of life and Good Deeds
11	Leave This Chanting and Singing – Rabindranath Tagore	Patriotism, and all Several Human Values
12	On His Blindness – John Milton	Patience and Faith in God
13	The Lotus - Toru Dutt	The Quality of Equality and Consideration
14	The Quality of Mercy – William Shakespeare	Value of Mercy

Dr Anil M. Katrojwar
Head, Department of English
Arts, Commerce College, Yeoda

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

	B. A. PART (II)	
	PROSE	
01	India's Message To The World - Swami Vivekananda	Patriotism, Humanity, Spirituality
02	The Pleasures of Ignorance – Robert Lynd	Curiosity, Inquisitiveness
03	The Happy Prince –Oscar Wilde	Sympathy, Pity, Virtue of Charity and Sacrifice
04	The Three Questions –Leo Tolstoy	Caring, Peace, Goodness
05	On The Conduct of Life – William Hazlitt	Wisdom, Love, Sympathy, Morality
06	Why Are Beggars Despised? – George Orwell	Social Equality

	POETRY	
01	Sonnet 116- William Shakespeare	Power and Greatness of True Love
02	Dirge –James Shirley	Importance of Just Life and Goodness
03	Leisure –W. H. Davies	Significance of living life happily
04	A Baby Asleep After Pain – D. H. Lawrence	Value of Divinity
05	Where The Mind Is Without Fear – Rabindranath Tagore	Patriotism and several Human Values
06	A Lament – P. B. Shelley	Value of Life & Time
07	Love in A Life – Robert Browning	Futility of Desires & Goals human being constantly runs after
08	Up-Hill – Christina Rossetti	Goodness, Duty, and Sacrifice

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
Arts Commerce College, Yeoda
Tq. Daryapur, Dist. Amravati

Dr Anil M. Katrojwar
Head, Department of English
Arts, Commerce College, Yeoda

	B. A. PART (III)	
	PROSE	
01	The Three Hermits – Leo Tolstoy	Humbleness and Sincerity
02	What Is Swaraj? M. K. Gandhi	Self-Rule, Passive Resistance and Self-Reliance
03	A Letter To His Son – Earl of Chesterfield	Patience, Truth, Politeness, Kindness, the Arts of Speaking and Pleasing
04	Quality – John Galsworthy	Dedication
05	The Open Window- Saki	The quality story-telling
06	Miss Brill – Katherine Mansfield	Respect for elders, Consideration
07	Socrates And The Schoolmaster – F. L. Brayne	Importance of Education, Health and Hygiene ,Dutifulness
	POETRY	
01	Bangle Sellers – Sarojini Naidu	Love and Sacrifice of an Indian Woman for her family
02	The Mountain And The Squirrel – R. W. Emerson	Equality for every creature
03	The Solitary Reaper – William Wordsworth	Melody of Music
04	Stay Calm – Grenville Kleiser	Value of Keeping Cool

Signature

Dr. Anil Katrojwar, (HoD)

Dr Anil M. Katrojwar
Head, Department of English
Arts, Commerce College, Yeoda

Principal
Arts-Commerce College,
Yeoda, Dist. Amravati

Coordinator
Internal Quality Assurance Cell
